



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा






रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रुपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. २१.०१.२०२५ | अंक नं. २७१ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020



प्रशस्त दालन | प्रशस्त वाहनतळ | होलसेल विभाग | विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090


# जप्ती, वसुलीचे कायदे कागदावरच, कुणाला कशाचाच ना राहिला धाक

## करवसुलीत महानगरपालिका अपयशी, वसुली आणि सेवेचा दर्जा सुधारण्याचे कर्तृत्व दाखवावे

नगर – महापालिकेचे नेहमीचे रडगाणे सुरू असून, कर वसुली नाममात्र आहे. विकास निधीबाबत विस्कळीत व्यवस्थापन दिसून येत आहे. अनेक रस्त्यांची कामे एक वर्षापासून रेंगाळलेली आहेत. आता जिल्ह्याला पालकमंत्री मिळाले. सुदैवाने त्यांच्याकडे जलसंधारणाचेच खाते आहे. त्यांनी पिढ्यान् पिढ्यांचा पाण्याचा प्रश्न सोडवून पालकाची जबाबदारी पार पाडावी, अशी अपेक्षा जागरुक नागरिक मंचाचे अध्यक्ष सुहास मुळे यांनी व्यक्त केली आहे.

अहमदनगरच्या नावाचा अहिल्योध्दार झाला परंतु आम्ही नागरिक अजूनही शापितच राहिलेलो आहोत. घरपट्टी आणि पाणीपट्टी वसूल करण्यामध्ये अहमदनगर महानगरपालिका सातत्याने गेले २५ वर्ष अपयशी ठरत आहे. म्हणून ही थकबाकी चक्क २६५ कोटीच्या घरात पोहोचली आहे. जप्ती आणि वसुली यासारखे अधिकार आणि कायदे फक्त कागदावरच आहेत. उगीच थातूरमातूर कारवाई केली जाते कुणाला कशाचा धाक राहिलेला नाही. ही कथा फक्त अहमदनगर महानगरपालिकेची नसून महाराष्ट्रामध्ये किमान दीडशे पालिकांची हीच अवस्था आहे.

गेल्या पाच वर्षापासून कुठल्याही मनपा किंवा जिल्हा परिषदेच्या निवडणुका झाल्या नाहीत आणि संपूर्ण महाराष्ट्र जणू प्रशासक राजवरच चाललेला आहे. सरकार कानात तेल घालून मूग गिळून गप्प आहे. विकास आणि चांगले प्रशासन या नुसत्या घोषणा करून भागणार नाही, यावर अमुलाग्र आणि थेट कृतीची आवश्यकता आहे.

फक्त नावाच्या बाबतीत अहिल्योध्दार झालेल्या या अहिल्यानगर बाबतीत तर ते फार गरजेचे आहे. पाणीपट्टी वाढ करण्याच्या निर्णयाच्या विरोधात बरीच टीका टिपणी होत असताना खरे म्हणजे पाणीपट्टी मध्ये कालानुरूप वाढ होणे, जितके गरजेचे आहे, तितकेच अनधिकृत नळजोड कनेक्शन शोधून त्यावर कारवाई करणे आणि त्यांच्याकडून कर वसूल करणे महत्त्वाचे आहे. कोणतेही काम धाडसाने आणि प्रामाणिकपणाने न करणारे प्रभाग अधिकारी आणि बेकादेशीर गोष्टींना पाठीशी घालणारे नगरसेवक आणि लोकप्रतिनिधी यांच्यामुळे नगर शहरामध्ये नव्वद हजार मालमत्ता रेकॉर्डमध्ये नोंदलेल्या आहेत आणि प्रत्यक्षामध्ये नळ कनेक्शन ५५ हजार आहेत.. ही तफावत बरंच काही सांगून जात असल्याचे मुळे यांनी मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे.

आगरकर मळा, स्टेशन रोड परिसरामध्ये सगळे मोठे मोठे नेते आणि मोठे मोठे अधिकारी राहत असताना तब्बल एक आठवडा पाणीपुरवठा झाला नाही, कारण बार्शीकरांच्या काळात पन्नास वर्षांपूर्वी टाकलेल्या जमिनीखालच्या पाईपलाईन पूर्णपणे गंजलेल्या असल्यामुळे त्या वारंवार नादुरुस्त होत आहेत, म्हणून हा प्रश्न सर्वांना भेडसावत आहे की फेज वन फेज टू भुयारी गटार योजना यासाठी आलेले करोडो रुपये नेमके कुठे आणि कशासाठी खर्च झाले आहेत. हे फेज वन आणि फेज टू व भुयारी गटार.. जमिनीखाली नेमके कुठे पूर्ण झाले आहेत हे शोधण्यासाठी इंटरपोल, सीआयडीची मदत घ्यावी लागेल की काय असे वाटते.

पाणीपट्टी, घरपट्टी यासारखे कर कालानुरूप वाढवण्यामध्ये खरे म्हणजे कुठलाही विरोध करणे बरोबर नाही, परंतु त्याच बरोबर दर आणि दर्जा याविषयी जर प्रशासन विचारच करताना दिसत नाही.ा दर्जा दिला तरच दर वाढवायचा प्रशासनाला अधिकार आहे. मग दर्जा जर चांगला असेल तर अशावेळी कोणीही सुज्ञ नागरिक कर दर वाढीला विरोध करणार नाही. विमानाचे भाडे आकारून तुम्ही जर बैलगाडीतच नेणार असाल तर ते शक्य नाही.

सेवा दर्जाचा आलेख अधोगतीकडे न्यायचा आणि करवाढीचा आलेख मात्र नेहमीची येतो पावसाळा या उक्तीप्रमाणे दर पाच वर्षांनी सरसकट डोळे झाकून दरवाढ करायची हे कोणीही सहन करून घेणार नाही. हे असेच दुष्टचक्र चालू राहिले तर महानगरपालिका मुडदूस अवस्थेमधून कधीच बाहेर येणार नाही, लोकांना कधी सेवा मिळणार नाही. मेवा खाणारे खात राहतील आणि नागरिकांकडून कर बुडवेगिरी केलीच जाईल. या दुष्टचक्रातुन बाहेर येण्यासाठी वेगवान विकास करणाऱ्या या नवीन सरकारने या कर चुकवेगिरीबाबत वसुलीबाबत आणि सेवा दर्जा सुधारण्याबाबत त्यांचे कर्तृत्व दाखवावे. यासाठी विशेष करून पालकमंत्र्यांनी पालकाची भूमिका बजावणे अपेक्षित आहे. आणि आम्हा शापित बालकांच्या तक्रारी कोणाकडे सांगायच्या. यासाठी आपल्या कार्यालयाचा चालू असलेला ईमेल आयडी जर पालकमंत्र्यांनी सार्वजनिकरित्या दिला आणि त्या मधल्या गोष्टींची पालकाच्या मायेने दखल घेतली तर आम्हा वर फार मोठे उपकार होतील, असा उपरोधिक टोला अध्यक्ष सुहास मुळे यांनी मारला आहे. *(छायाचित्र पान २ वर)*






जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## नदीजोड प्रकल्पाचे महास्वप्न.. प्रकल्प

आपल्या भारतात सामान्यतः आपण सगळेच नैसर्गिक उपलब्धीला गृहीत धरतो. त्या निसर्गाच्या सेवासुविधांचा प्रचंड ऱ्हास होत असतांनाही त्याकडे बेफिकीरीने पाहात उलट यात आपणही सहभागी होता. सार्वजनिक अस्वच्छता हा तर जणू आपला लोकशाही अधिकार!

यातूनच प्रदूषणाने पाणी, झाडे, हवा यासारख्या नैसर्गिक पण जीवनदायिनी घटकांचे अक्षम्य नुकसान होत आहे. आपण करीत आहोत. पंतप्रधान वाजपेयींपासून आताचे सरकार नदीजोड प्रकल्पाचे महास्वप्न पाहून कार्य करण्याचा प्रयत्न करीत आहे. नुकत्याच नव्याने, पुन्हा मुख्यमंत्री झालेल्या देवेंद्रजींनी शपथविधीनंतर नद्याजोड प्रकल्पाचा संकल्प बोलून दाखवला आहे.

हा नदीजोड प्रकल्प मराठवाड्यासाठी भाग्यविधाता असणार आहे. मध्यप्रदेश,

वाचनीय मननीय
प्रेरणादायी
अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१

राजस्थान यादरम्यान वाहणाऱ्या पार्वती, कालीसिंध आणि चंबळ नद्यांचे पाणी हे मोठे जलस्त्रोत म्हणून पाहिले जाते. या नद्या जोडण्यासाठी अलीकडेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भूमिपूजन केले.



आपल्या व नजीकच्या नाशिकच्या जलसंपदेसाठी मंत्रीही जिल्ह्याचे लाभलेत. आपली सीना, नाशिकची गोदावरी यांना स्वच्छ पाणी, प्रवाहित करून निरंतर वाहती ठेवण्यास ते संकल्प व प्रयत्न करू शकतात. वाहेल स्वच्छ... झुळझळ पाणी तर जीवन गाईन गाणी...

# भातोडी गावच्या महिला सरपंचावर अविश्वास ठराव मंजूर

### ९ पैकी ७ सदस्यांनी केले अविश्वासाच्या बाजूने मतदान

नगर – कामाचा गैरवापर व पदाचा अनियमित वापर करून शासकीय कामाचे उल्लंघन केल्याचा ठपका ठेवत नगर तालुक्यातील भातोडी गावच्या महिला सरपंच सौ. ज्योती विक्रम लबडे यांच्यावर ग्रामपंचायत सदस्यांनी आणलेला अविश्वास ठराव २१ जानेवारीला झालेल्या विशेष सभेत मंजूर झाला आहे. ग्रामपंचायतच्या एकूण ९ पैकी ७ सदस्यांनी अविश्वासाच्या बाजूने मतदान केले आहे.

अहिल्यानगरचे तहसीलदार संजय शिंदे यांच्यासमोर ही सर्व प्रक्रिया पार पडली. सरपंच सौ.ज्योती विक्रम लबडे यांच्या विरोधात ७ सदस्यांनी अविश्वास ठराव १६ जानेवारीला तहसीलदारांकडे दाखल केला होता. त्यावर तहसीलदार शिंदे यांनी २१ जानेवारीला ग्रामपंचायत कार्यालयात सदस्यांची विशेष सभा बोलावली होती.

या सभेत उपसरपंच राजू पटेल, ग्रामपंचायत सदस्य सुभाष घमाजी कचरे, सुनिता विक्रम गायकवाड, सुनिता जालिंदर लबडे, कैलास कुशाबा गांगर्डे, मुमताज शाकीर मुलानी, उल्फत युनुस पटेल या ७ सदस्यांनी अविश्वास ठरावाच्या बाजूने स्वाक्षऱ्या केल्या आहेत. महिला सरपंच असल्याने एकूण ९ पैकी ७ सदस्यांनी अविश्वास ठरावावर स्वाक्षऱ्या केल्या. तसेच लक्ष्मण फकीरा लबडे हे सदस्य अनुपस्थित होते. त्यामुळे सरपंच लबडे यांच्या बाजूने त्यांचे स्वताचेच मत राहिले. त्यामुळे हा अविश्वास ठराव मंजूर करण्यात आला आहे.

ग्रामपंचायत कारभार करताना सदस्यांना सरपंच ज्योती लबडे या कोणत्याही कामाबाबत विश्वासात घेत नव्हत्या. कामाबद्दल विचारणा केली असता अरेरावीची भाषा वापरायच्या. त्यांच्या कार्यकाळात झालेल्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर अफरातफर झाल्याचे दिसून येत होते. यामुळे आम्ही सर्वजण अविश्वास ठरावाच्या बाजूने आहोत. असे या सदस्यांचे म्हणणे आहे.

# अखिल भारतीय विभागीय मराठी नाट्यसंमेलनासाठी महानगरपालिकेकडून २५ लाखांचे आर्थिक सहकार्य

नगर – अखिल भारतीय नाट्य परिषदेने १०० वे अखिल भारतीय मराठी विभागीय नाट्य संमेलनाचा मान अहिल्यानगरला दिला आहे. २६ व २७ जानेवारी रोजी हे विभागीय नाट्य संमेलन अहिल्यानगरमध्ये माऊली सभागृह व पेमराज सारडा महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित करण्यात आले आहे. नगरकर नाट्य रसिक तसेच रंगकर्मींना मोठी सांस्कृतिक मेजवानी या संमेलनातून मिळणार आहेच, शिवाय शहरात सांस्कृतिक वातावरण या माध्यमातून तयार होत आहे. सुमारे दोन कोटीपर्यंत या संमेलनाचा खर्च असणार आहे. त्याला हातभार म्हणून महानगरपालिकेने या संमेलनास २५ लाख रुपयांचे आर्थिक सहकार्य केले आहे. नगरकर रसिकांनी संमेलनातील विविध कार्यक्रमांना उपस्थित रहावे, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे.



अखिल भारतीय विभागीय मराठी नाट्यसंमेलनासाठी महानगरपालिकेकडून २५ लाखांचे आर्थिक सहकार्य करण्यात आले.

अहिल्यानगर शहरात महानगरपालिकेमार्फत सोयी सुविधा पुरवल्या जातात. मात्र, शहरात विविध क्षेत्रात होणाऱ्या सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमांना प्रोत्साहन देणे, ही महानगरपालिकेचीही जबाबदारी आहे. आमदार संग्राम जगताप यांनी यासाठी पुढाकार घेतला आहे. त्यामुळेच शहरवासीयांसाठी होत असलेल्या नाट्य संमेलनास महानगरपालिकेकडून सहकार्य करण्यात आल्याचे आयुक्त डांगे यांनी सांगितले.

संमेलनात दोन दिवस बालनाट्य महोत्सव, लोककला महोत्सव, एकपात्री, संगीत नाट्य प्रवेश, प्रायोगिक, व्यावसायिक नाटकांचे प्रयोग, एकांकिका, चर्चासत्रे, परिसंवाद, प्रशिक्षण शिबिरे असे भरगच्च कार्यक्रम होणार आहेत. माऊली सभागृहात नाटकांचे प्रयोग होणार आहेत. २२ जानेवारी रोजी रात्री ८ वाजता तुझी औकात काय आहे? या नाटकाचा प्रयोग रंगणार आहे. २३ जानेवारी रोजी रात्री ८ वाजता साती साती पन्नास, २५ जानेवारी रोजी रात्री ८ वाजता मर्डरवाले कुलकर्णी व समारोपाच्या दिवशी २७ जानेवारी रोजी रात्री ८ वाजता मोरूची मावशी हे नाटक सादर होणार आहे. २४ जानेवारी रोजी भव्य बालमहोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यात सकाळी १० ते ११ यावेळेत अजय लाटे लिखित आणि शैलेश देशमुख दिग्दर्शित एकांकिका जिना इसिका का नाम है! सादर होईल. सकाळी ११ ते १२ यावेळेत गौरी जोशी लिखित आणि डॉ. विजयकुमार दिग्दर्शित एकांकिका हीच खरी सुरुवात, दुपारी १२ ते १ यावेळेत भारत शिरसाठ आणि चेतन सैंदाणे लिखित व आत्मदर्शन बागडे दिग्दर्शित एकांकिका – डस्टर सादर करण्यात येईल. दुपारी १ ते २ यावेळेत उदघाटन समारंभ होणार असून दुपारी २ ते ३.३० यावेळेत रामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशन निर्मित कृष्णलीला ही नृत्य नाटिका सादर होणार आहे.

प्रजासत्ताक दिनी २६ जानेवारी रोजी सकाळी १० ते ११ यावेळेत लोककला महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. सकाळी ११ ते १२ यावेळेत एकपात्री आणि नाट्यप्रवेश सादरीकरण, दुपारी १२ ते १.३० यावेळेत संगीत नाटकातील नाट्यप्रवेश, दुपारी २ ते ३ यावेळेत परिसंवाद, चर्चासत्र होईल. दुपारी ३ ते ४ यावेळेत धाराशिव येथील कलाकार विशाल शिंगाडे निर्मित कार्यक्रम होणार आहे. २७ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० ते ११ यावेळेत पुरुषोत्तम करंडक विजेती एकांकिका देखावा (न्यू आर्टस् कॉलेज) सादर करण्यात येणार आहे. सकाळी ११.१५ ते १२.१५ यावेळेत उपनिषद (संकल्पना फौंडेशन, कोपरगाव) दुपारी १२.३० ते १.३० दरम्यान ब्रँडेड बाय सडकछाप (अहिल्यानगर) या गाजलेल्या एकांकिकांचे सादरीकरण होईल. दुपारी २.३० ते ३.३० यावेळेत नाट्यजागर विजेती एकांकिका नवस सादर होणार आहे. दुपारी ३.४५ ते ५.०० नाटक समजून घेताना या विषयावर परिसंवाद होणार आहे. यात संमेलनाध्यक्ष डॉ. जब्बर पटेल, दिग्दर्शक विजय केंकरे, अभिनेते तथा अखिल भारतीय नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले सहभागी होणार आहेत. संध्याकाळी ६ ते ८ दरम्यान संमेनलाचा समारोप समारंभ होणार आहे.

संमेलनाचे यजमानपद अहिल्यानगरला मिळाले असून, सर्व कलाप्रेमी नगरकरांसाठी संमेलन संस्मरणीय ठरणार आहे. या संमेलनामुळे नगरच्या सांस्कृतिक वैभवात मोठी भर पडेल, असा विश्वास व्यक्त करतानाच या संमेलनात नगरकरांनी सहभागी व्हावे, असे आवाहनही यशवंत डांगे यांनी केले आहे.

# चालकाला दमदाटी करत महामार्गावरुन टेम्पो पळविला

### ३५ लाख रुपयांचा मुद्देमाल केला लंपास, जेऊर टोलनाक्यावरील घटना

नगर – आयशर कंपनीच्या टेम्पो मध्ये विविध साहित्य घेवून ते सांगितलेल्या ठिकाणी पोहोच करण्यासाठी निघालेल्या टेम्पोचालकाला दमदाटी करून त्याच्या कडून बळजबरीने टेम्पोची चावी घेवून तो टेम्पो त्यात असलेल्या विविध साहित्यासह एका व्यक्तीने पळवून नेल्याची घटना नगर ते छत्रपती संभाजीनगर महामार्गावर असलेल्या जेऊर टोलनाक्याजवळ १८ जानेवारीला रात्री ९ च्या सुमारास घडली.

याबाबत टेम्पो चालक डोमनकुमार साहू (वय २४, रा. छत्तीसगड) याने २० जानेवारीला पहाटे एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी साहू हा त्याच्या ताब्यातील आयशर टेम्पो मध्ये (क्र.सी एस ०४ पी एस ०७६८) यामध्ये ट्रान्सपोर्ट कंपनीने भरून दिलेले लोखंडी पाईप, अल्युमिनियम वायर असे साहित्य घेवून ट्रान्सपोर्ट कंपनीने सांगितलेल्या ठिकाणी पोहोच करण्यासाठी नगर मार्गे जात होता.

१८ जानेवारीला रात्री ९ च्या सुमारास त्याने टेम्पो जेऊर टोलनाक्याजवळ थांबवला. तेथे स्वयंपाक करून तो जेवत असताना तेथे एक अनोळखी इसम आला. त्याने चालकाला दमदाटी सुरु केली. त्यानंतर बळजबरीने टेम्पोची चावी घेवून तो टेम्पो त्यात असलेल्या विविध साहित्यासह पळवून नेला. टेम्पोची अंदाजे किंमत १५ लाख आणि साहित्याची किंमत २० लाख असा सुमारे ३५ लाखांचा ऐवज त्या अनोळखी इसमाने चोरून नेल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे.

या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात इसमाविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०९ (४) अन्वये जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

# कोयता व चाकूने वार करुन युवकाच्या खुनाचा प्रयत्न

### एमआयडीसी परिसरातील घटना, ७ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – एमआयडीसी येथून घराकडे जात असलेल्या युवकास ७ जणांनी अडवून शिवीगाळ दमदाटी करीत, कोयता व चाकूने वार करून त्याच्या खुनाचा प्रयत्न केल्याची घटना १९ जानेवारीला रात्री ८.३० च्या सुमारास नगर मनमाड रोडवरील चेतना कॉलनी येथे घडली.

याबाबतची माहिती अशी की विशाल जालिंदर काटे (रा. छत्रपती शिवाजीनगर, गरवारे चौक, नवनागापूर ) हा एमआयडीसी येथून घरी जात असताना रस्त्यातील एका पानटपरीवर बोलत असताना तेथे विठ्ठल उर्फ भोऱ्या नवनाथ काळे, महेश बाबासाहेब आरु, अभि भोसले, जॉय सोनवणे, प्रतीक पवार (तिघांचे पूर्ण नाव माहित नाही.), गणेश नवनाथ काळे, सोनू काळे (सर्व रा. नवनागापूर अ.नगर) यांनी त्यास अडवून शिवीगाळ दमदाटी करीत धारदार कोयता, चाकू आणि लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करून त्याच्या खुनाचा प्रयत्न केला. या मारहाणीत विशाल काटे हा गंभीर जखमी झाला.

या प्रकरणी एमआयडीसी पोलिसांनी विशाल काटे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विठ्ठल काळे, महेश आरु, अभि भोसले, जॉय सोनवणे, प्रतीक पवार, गणेश काळे, सोनू काळे यांच्याविरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक जाधव करीत आहे.

# जलवाहिनी गळतीमुळे घरात घुसले पाणी

### नगरसेवक योगीराज गाडे यांनी तारकपूर भागाला दिली भेट

नगर – अहिल्यानगर शहरातील तारकपूर भागात गेल्या पाच ते सहा दिवसांपासून महापालिकेच्या मुख्य जलवाहिनीमध्ये गळती होऊन तीन गल्लींमध्ये पाणी साचले आहे. यामुळे घरांमध्ये पाणी शिरून नागरिकांना रोज पाणी बाहेर काढण्याचे कष्ट करावे लागतात. घरांच्या आतील भागात पाणी घुसल्याने नागरिकांची मालमत्ता देखील नष्ट झाली आहे.

महापालिकेने नागरिकांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करत, पाणीपट्टी आणि मालमत्ता करात १००% वाढ केली आहे. मात्र, त्या बदल्यात नागरिकांना किमान मूलभूत सुविधा देखील मिळत नाहीत. पाणी गळतीमुळे निर्माण झालेल्या या समस्या विरोधात नागरिकांनी अनेक तक्रारी केल्या, पण महापालिकेने कोणतीही ठोस कारवाई केली नाही.





मनपाच्या जलवाहिनी गळतीमुळे नागरिकांच्या घरात घुसलेले पाणी. या समस्येची पाहणी करताना माजी नगरसेवक योगिराज गाडे.

नगरसेवक योगीराज गाडे यांनी नागरिकांच्या तक्रारीवर त्वरित प्रतिक्रिया दिली. त्यांनी स्वतः तारकपूर भागाला भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. या प्रकरणावर त्वरित लक्ष देण्याचे निर्देश महापालिकेच्या अधिकाऱ्यांना दिले आणि नागरिकांची समस्या लवकरात लवकर सोडवण्याचे आश्वासन दिले.

नगरसेवक योगीराज गाडे म्हणाले, गेल्या ५-६ दिवसांपासून ही समस्या सुरू आहे आणि घरात पाणी शिरल्यामुळे नागरिकांचे मोठे नुकसान झाले आहे. महापालिकेने तातडीने या गळतीचे निराकरण करावे. मी याबाबत महापालिका प्रशासनाला सांगितले आहे.

नागरिकांची ही समस्या त्वरित सोडवली जावी, अशी अपेक्षा सर्वांमध्ये आहे. जर महापालिकेने यावर जलद कार्यवाही केली नाही, तर नागरिकांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल.

## श्रीमती वंदना श्रीपत यांचे अल्प आजाराने निधन



नगर – बोल्हेगाव फाटा, राधाकृष्ण मंदिराजवळील रहिवासी श्रीमती वंदना विष्णू श्रीपत (वय ५७) यांचे २० जानेवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर २१ जानेवारी रोजी बोल्हेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## श्रीमती सुशिलाबाई कटारिया यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – बुरुडगाव रोड, स्काय ब्रीज येथील रहिवासी श्रीमती सुशिलाबाई शंकरलाल कटारिया (वय ९०) यांचे २१ जानेवारी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे २ मुले, सुना, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. मे. राजेंद्रकुमार शंकरलाल कटारियाचे संचालक अशोक व राजेंद्र कटारिया यांच्या त्या मातोश्री होत.

## नवनीत कटारिया यांचे ह्दयविकाराने निधन



नगर – श्रीगोंदा येथील रहिवाशी नवनीत दगडूलाल कटारिया (वय ६५) यांचे २१ जानेवारी रोजी ह्दयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर श्रीगोंदा अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, ३ मुली, जावई, १ भाऊ, पुतण्या, नातवंडे असा परिवार आहे.

## वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या तीन हातगाड्यांवर कारवाई

नगर – रस्त्याच्या मधोमध हातगाडी उभी करून वाहतुकीला व रहदारीस अडथळा आणत नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण होईल अशा अवस्थेत हातगाडी लावणाऱ्या तीन हातगाडी चालकावर तोफखाना पोलिसांनी दिल्लीगेट परिसरात १९ जानेवारीला कारवाई केली.

तोफखाना पोलीस दिल्लीगेट परिसरात गस्त घालत असताना त्यांना दिल्लीगेट परिसरात वैभव प्रकाश सरकटे (वय ३८, रा. ठाणगे मळा, कल्याण रोड), हर्ष मुकेश कलोशिया (वय २१, रा. जय जलाराम फ्रूट जवळ, खिस्त गल्ली), अनिल गोवर्धन राऊत (वय ३४, रा. गणपती मंदिर समोर, दिल्लीगेट) या तिघांनी खाद्य पदार्थांच्या हातगाड्या रस्त्यात अडथळा निर्माण होईल अशा स्थितीत लावल्याचे आढळून आले. त्यामुळे पो.कॉ. सावळेराम क्षीरसागर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तीन हातगाडी चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता २८५ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# दिव्यांगाच्या विविध मागण्या पूर्ण कराव्यात अन्यथा २६ जानेवारीला राज्यव्यापी आंदोलन

नगर – प्रहार दिव्यांग क्रांती संस्थेच्यावतीने दिव्यांगाच्या विविध मागण्यासाठी जिल्हाधिकारी सिद्धराम सालीमठ यांना निवेदन देण्यात आले. यावेळी प्रहार दिव्यांग क्रांती संस्थेच अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष लक्ष्मण पोकळे यांच्यासह संस्थेचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी निवेदनात राज्यातील दिव्यांगाना प्रतिमहा ६००० रुपये पेन्शन तातडीने लागू करण्यात यावी व उत्पन्नाची अट १,५०,००० रुपये करण्यात यावी. राज्यातील प्रत्येक जिल्हयामध्ये सुसज्य अशा दिव्यांग भवनाची निर्मिती करावी. शासन निर्णयानुसार दिव्यांगाना आंतोदय योजनेचा लाभ देण्यात यावा. राज्यातील दिव्यांगाना व्यवसासायासाठी व राहण्यासाठी शासन निर्णयानुसार २०० चौ. फुट जागा उपलब्ध करुन द्यावी. दिव्यांगाकरीता संपुर्ण राज्यात फिरती विक्री केंद्र दिलेली आहेत ती वाहने अत्यंत निकृष्ट दर्जाचे आहे ती परत घेवुन चांगल्या प्रतीचे वाहने दिव्यांगाना परत देण्यात यावी. दिव्यांगाना राजकीय आरक्षण देण्यात यावे. राज्यातील आमदार व खासदार निधी खर्च करण्यात येत नाही. तरी वार्षिक ३० लाख निधी दिव्यांगाच्या पुर्नवसाकरीता तातडीने खर्च करण्यात यावा शासन निर्णया प्रमाणे दिव्यांग वित्त विकास महामंडळाकडून दिव्यांगांना वितरित केलेल्यांना कर्जमाफी करण्यात यावी, शासकीय जामीनदाराची अट रद्द करण्यात यावी. राज्यातील प्रत्येक जिल्हयामध्ये स्वयंरोजगाराकरीता स्टॉल देण्याचे धोरण तयार करुन ते स्टॉल दिव्यांगांना तातडीने वाटप करण्यात यावे. दिव्यांग कल्याण विभाग स्थापन केल्यानंतर मंत्री मंडळाच्या बैठकीतील सदर विभागाकरीता २०६३ पदे मंजुर करण्यात आलेली आहेत. परंतु आजतगातय भरली गेलेली नाहीत ते तातडीने भरण्यात यावे. संजय गांधी निराधार योजना व महापालिका हद्दीतील दिव्यांगांना दरमहा नियमित निर्वाह भत्ता मिळावा आदी मागण्या करण्यात करण्यात आल्या

मागण्या लवकरात लवकर पूर्ण कराव्यात अन्यथा राज्यव्यापी आंदोलन प्रहार दिव्यांग क्रांती संस्थे तर्फे २६ जानेववारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.





शहरातील सक्कर चौकात पाईपलाईनचे काम करण्यासाठी खोदलेला रस्ता छायाचित्रात दिसत आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### श्वासाची दुर्गंधी घालवा

वेलदोडा चघळणं, हा श्वासाच्या दुर्गंधीवर प्रभावी असा उपाय आहे. यामुळे तोंडाला दुर्गंधी येणार नाही. शिवाय अती प्रमाणात लागणारी तहानही कमी होईल. पचनास मदत करण्यापासून ते शांत प्रभाव प्रदान करण्यापर्यंत, वेलचीला शरीरावरील सकारात्मक प्रभावांसाठी मोठ्या प्रमाणावर परिणाम होतो असे मानले जाते.

## पाककला

### मेक्सिकन् पुडिंग

**साहित्य :** एक संत्रे, दोन केळी, अर्धी वाटी द्राक्षे, दोन चिक्कू, चार चमचे साखर, ग्लूकोजची आठ-दहा बिस्किटे, ब्रेडच्या चार चकत्या (स्लाइस), कस्टर्ड पावडर दोन चमचे, एक कप दूध, एक कप क्रीम, लिंबू.

**कृती :** सर्व फळे बारीक चिरून, त्याला लिंबाचा रस (दोन-तीन थेंब) लावून ठेवावा. एक कप दुधात कस्टर्ड तयार करावे. एका डिशमध्ये पावाच्या दोन स्लाइस ठेवाव्यात. त्यावर चार-पाच बिस्किटे मोडून घालावीत. त्यावर कस्टर्ड घालावे. मग त्याच्यावर फळांचे तुकडे घालावेत. नंतर राहिलेल्या पावाच्या दोन स्लाइस घालाव्यात व त्यावर राहिलेल्या बिस्किटांचे तुकडे घालावेत. नंतर त्यावर क्रीम ओतावे व चेरीचे डेकोरेशन करून ही डिश रेफ्रिजरेटरमध्ये सहा तास ठेवून द्यावी.

## वास्तू

### ब्रम्हस्थान

ब्रम्हस्थानात खड्डा, पाणी, उतार, शौचालय अथवा बाथरूम मुळीच नसावे. अन्यथा फार मोठ्या प्रमाणावर संकटांची मालिका सुरू होते. फ्लॅट संस्कृतीच्या घरात संपूर्ण ब्रम्हस्थान भिंत-कॉलम अथवा जड सामान विरहित असणे केवळ अशक्य आहे.

## सल्ला

लहान मुले अंथरूण ओले करत असतील तर गुळ घालून केलेले काळे तीळाचे लाडू खायला द्या.

## सौंदर्य

मेंदी काढून झाल्यावर त्यावर साखर आणि लिंबू यांच्या पाण्याचे मिश्रण लावावे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. २२ जानेवारी २०२५

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, पौष कृष्णपक्ष, स्वाती २६|३४, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. ३६ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** व्यापारिक भागीदारीसाठी उत्तम वेळ. अधिकारांचा योग्य वापर कराल. स्पर्धा, पैजा जिंकू शकाल.

**वृषभ :** मनावरील दडपण दूर. अनुसंधानातून कार्यक्षेत्रात प्राप्ति योग. कोणतेही काम एखाद्यावर विसंबन केल्यास तोटा संभवतो.

**मिथुन :** कार्यक्षमता वाढल्याने उत्साह वाढेल. अभीष्टसिद्धी होईल. फायदा होईल. विरोधक करार करतील. आरोग्य नरम-गरम राहील. पाठबळ मिळेल.

**कर्क :** अध्ययनात रूचि वाढेल. कामांची प्रशंसा होईल. भागीदारी पक्षात होऊ शकते. मनाला प्रसन्नता वाटेल. वैवाहिक जीवनात सुख मिळेल.

**सिंह :** रोग, ऋण संबंधी कार्यात विशेष लाभ मिळेल. उत्तम वाहन सुख. तब्बेतीत सुधारणा. धार्मिक कार्यात वेळ जाईल.

**कन्या :** जोडीदारा बरोबर तणाव राहिल. मतभेदांपासून लांब रहा. व्यापार चांगला राहील. विवाह योग, घरात शुभ मांगलिक कार्ये.

**तूळ :** धर्म, आध्यात्मात रूचि वाढेल. अनुकूलतेमुळे मन प्रसन्न राहील. कार्यक्षेत्राचा विकास आणि विस्तार होईल. लाभ होईल.

**वृश्चिक :** व्यापारात बुद्धिमत्ता, दूरदर्शितेची प्रशंसा होईल. अत्यधिक प्रयत्नांचा अल्प लाभ मिळेल. तणाव अडचणी राहतील.

**धनु :** अर्थप्राप्ती झाल्याने खर्चाचे प्रश्न सुटतील. अध्ययनात छान यश. काळजीपूर्वक काम कराल. परिश्रमाने कामाचे शुभ परिणाम येतील.

**मकर :** भागीदारीतून विशेष लाभ. उपजीविकेच्या स्त्रोतातून लाभ होईल, लोकप्रियतेत वृद्धि होईल.

**कुंभ :** मागील उधारी वसुल होईल. जुने मित्र भेटल्याने आनंद होईल. कार्यालयीन कामकाजात यश मिळेल.

**मीन :** पाठबळ मिळेल. मनाला प्रसन्नता वाटेल. मित्रांकडून आर्थिक लाभ होईल. आनंदाची बातमी मिळेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# हसा आणि शतायुषी व्हा!

## 'कोण बोलतोयेस'

एकतर्फी प्रेम करून कंटाळलेल्या मोहनने अखेरीस आपली प्रेयसी राधिका हिला फोनवर प्रेमाबद्दल विचारायचा निर्णय घेतला. दूरध्वनी केल्यावर तो म्हणाला, ''राधिका आहे का?'' पलीकडून उत्तर आले, ''बोलतेय'' वेळ न दवडता मोहन म्हणाला, ''तू माझ्याशी लग्न करशील का?'' राधिका म्हणाली, ''नक्की करेन, पण तू कोण बोलतोयस हे नाव तरी सांग.''

# जागतिक आश्चर्ये

## चित्रांचे विश्व

गिओटो ऑफ बोनडोन याने जगातील चित्रांचे जे विश्व आहे त्यामध्ये त्याने प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली असे वैभव पेंटीजला त्यापूर्वी लाभलेले नव्हते. जे आकार व जी भव्यता त्यावरुन आपण त्यांची कल्पना करू शकतो.

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# शब्दगंध क्र. ७०९७

सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | | ४ | ५ | ■ |
| | ■ | ६ | | ■ | ७ | | ८ |
| | ■ | ९ | | | | ■ | |
| ■ | १० | ■ | | ■ | ■ | ■ | |
| ११ | | | ■ | १२ | १३ | १४ | |
| | ■ | ■ | १५ | ■ | १६ | | ■ |
| १७ | १८ | | | ■ | ■ | ■ | १९ |
| २० | | ■ | २१ | | | | |

**आडवे शब्द :-** १) उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री ६) अरण्य; जंगल; रान ७) डोंगराची तुटलेली बाजू; नदीचे उंच तीर ९) सुकुमार; नाजूक; कोमल ११) फार मोठा; अवाढव्य १२) जीव गेलेला; मेलेला १६) महिना; माह; माहे १७) एक चर्मवाद्य; मृदंग; पणवानक २०) घाण; विष्ठा २१) जबरदस्ती; जुलूम

**उभे शब्द :-** १) हेतू; प्लॅन; कल्पना; संकल्प २) अमावास्या ३) भास्कर; रवि; सूर्य ४) सुंदर; छान ५) स्तर; पापुद्रा ८) गोंद वगैरे चिकट पदार्थ १०) समुद्राच्या लाटांचा आवाज ११) ज्यास उपमा देता येत नाही असा १३) फिकीर; पर्वा १४) एक शब्दालंकार १५) नवलाचे; चमत्कारिक; आश्चर्यकारक १८) चिकट पेज; दुष्ट माणूस १९) एखाद्या तीर्थक्षेत्राला ठराविक दिवशी नियमित जाणे

### शब्दगंध क्र. ७०९६ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | न | मो | ल | ■ | व | द | न |
| न | व | ल | ■ | का | च | ■ | क |
| व | ■ | क | पा | ळ | क | रं | टा |
| र | व | री | ■ | बी | ■ | क | ■ |
| त | रु | ण | ■ | ट | प | ■ | वि |
| ■ | आ | ■ | वे | ■ | रि | का | मा |
| वा | ■ | ग | त | ध | वा | ■ | न |
| स | म | स्त | ■ | ग | र | ळ | ■ |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** किनारा सोडल्याशिवाय मोती हाती लागत नाही.

# मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

## रिकाम्या पोटी चहा पिणे खरेच धोकादायक आहे का?

चहा हा भारतीय जीवनशैलीचा एक महत्त्वाचा भाग आहे. सकाळची सुरुवात चहाशिवाय अपूर्ण वाटते. पण तुम्हाला माहिती आहे का की रिकाम्या पोटी चहा पिण्याची सवय तुमच्या शरीरासाठी हानिकारक असू शकते? बरेच लोक सकाळी उठल्याबरोबर रिकाम्या पोटी चहा पितात, विशेषतः दुधासह चहा, ज्यामुळे त्यांच्या आरोग्यावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

रिकाम्या पोटी चहा प्यायल्याने सर्वात आधी तुमच्या पचनसंस्थेवर परिणाम होतो. चहामध्ये असलेले कॅफिन आणि टॅनिन सारखे घटक पोटाच्या आतील आवरणाला नुकसान पोहोचवू शकतात. यामुळे ॲसिडिटी, जळजळ आणि अपचन यासारख्या समस्या उद्भवू शकतात. विशेषतः रिकाम्या पोटी दुधाचा चहा पिल्याने पोटात गॅस तयार होतो, ज्यामुळे दिवसभर जडपणा आणि अस्वस्थता जाणवते. सकाळी रिकाम्या पोटी चहा पिल्याने पोटाची आम्लता वाढते, कारण चहा पोटात हायड्रोक्लोरिक आम्लाची पातळी वाढवतो. हे आम्ल पोटाच्या भिंतींना नुकसान पोहोचवू शकते, ज्यामुळे पोटात अल्सर किंवा पोटदुखीसारख्या समस्या उद्भवू शकतात.

चहामध्ये असलेले टॅनिन शरीरातील पोषक तत्वांचे शोषण रोखू शकते. जर तुम्ही रिकाम्या पोटी चहा प्यायलात तर तुमच्या शरीरातील लोहासारख्या महत्त्वाच्या पोषक तत्वांची कमतरता भासू शकते. विशेषतः ज्यांना अशक्तपणा किंवा रक्ताच्या कमतरतेची समस्या आहे त्यांच्यासाठी रिकाम्या पोटी चहा पिणे आरोग्यासाठी आणखी हानिकारक ठरू शकते.

रिकाम्या पोटी चहा पिल्याने शरीरातील चयापचय असंतुलित होऊ शकतो. कॅफिनचा तुमच्या चयापचय आणि उर्जेच्या पातळीवर थेट परिणाम होतो. चहा पिल्यानंतर काही लोकांना ऊर्जा मिळते, परंतु रिकाम्या पोटी चहा पिल्याने उलट परिणाम होऊ शकतो. यामुळे अशक्तपणा, पित्त, थकवा आणि चक्कर येणे यासारख्या समस्या उद्‌वू शकतात.

सकाळी रिकाम्या पोटी चहा पिल्याने तोंडात बॅक्टेरियाची पातळी वाढू शकते. चहामधील साखर आणि आम्ल (जर तुम्ही गोड चहा प्यायलात तर) तोंडात बॅक्टेरियाच्या वाढीस प्रोत्साहन देतात. यामुळे दात किडणे आणि हिरड्यांच्या समस्या उद्भवू शकतात. चहामध्ये असलेले कॅफिन तुमच्या झोपेसाठी हानिकारक असू शकते. जर तुम्ही रिकाम्या पोटी चहा प्यायलात तर ते तुमच्या झोपेत व्यत्यय आणू शकते आणि शरीरात तणाव हार्मोन वाढवू शकते. यामुळे तुम्हाला निद्रानाश, अस्वस्थता आणि मानसिक ताण येऊ शकतो. रिकाम्या पोटी चहा पिल्याने पोटफुगी आणि गॅस तयार होणे यासारख्या सामान्य समस्या उद्भवतात. विशेषतः दुधासोबत चहा पिल्याने ही समस्या आणखी वाढू शकते. यामुळे पोटात जडपणा आणि अस्वस्थता येऊ शकते.

## उंट आणि झेब्रा

एका जंगलात एक उंट राहत होता. तो खूप मैत्रीपूर्ण आणि दयाळू होता. त्याची सर्व प्राण्यांशी चांगली मैत्री होती. तो सर्वांसोबत प्रेमाने राहत असे.

एके दिवशी त्या जंगलात एक झेब्रा आला. उंट झेब्राशी मैत्री करायला गेला.

जंगलात स्वागत आहे मित्रा! मी एक उंट आहे मी तुझ्याकडे मैत्रीचा हात पुढे करतो.

झेब्रा हा पांढऱ्या त्वचेवर काळे पट्टे असलेला सुंदर प्राणी होता. त्याला त्याच्या सौंदर्याचा खूप अभिमान होता. त्याने उंट पाहिला. जाड कातडी, लांब मान, पाठीमागे कुबडा, डोळ्यांवर मोठमोठ्या पापण्या, कुरूप खूर असा उंट पाहून झेब्राला वाटलं किती कुरूप आहे. माझ्यासारख्या सुंदर प्राण्याचा मित्रही सुंदर असावा. त्याने उंटाशी मैत्री करण्यास नकार दिला. मी एक सुंदर प्राणी आहे. तुझ्यासारख्या कुरूप प्राण्याशी माझी मैत्री होऊ शकत नाही. झेब्राच्या वागण्याने उंटाला खूप वाईट वाटले. तो शांतपणे निघून गेला.

काही वेळ गेला आणि उन्हाळा आला. त्या वर्षी खूप उष्णता होती. नदीच्या तलावांचे पाणी आटायला लागले. प्राणी पाण्यासाठी ओरडू लागले आणि सर्वजण पाण्याच्या शोधात जंगल सोडू लागले.

जंगलातील सर्व प्राणी अस्वस्थ झाले. पाण्याअभावी झेब्रासमोर जगण्याची आणि मरण्याची शक्यता होती. पण जेव्हा जेव्हा त्याने उंट पाहिला तेव्हा तो त्याला अगदी सामान्य वाटायचा. एके दिवशी त्याने उंटाला विचारले, ''सर्वांना या कडक उन्हात पाण्याची काळजी वाटते. पण तू काळजी करत नाहीस.''

''कारण मी कुरूप आहे.'' उंटाने हसत उत्तर दिले. झेब्राला त्याचा मुद्दा समजू शकला नाही. मग उंट म्हणाला -

''माझ्या पाठीवरचा हा कुबडा बघ. विचित्र दिसते. पण मी त्यात पाणी साठवू शकतो. यामुळे मला अनेक दिवस पाण्याची कमतरता भासत नाही आणि मी पाण्याशिवाय बराच काळ आरामात राहू शकतो. मला वासाने मरुद्यान देखील सहज सापडतो. मी तुला तिथे घेऊन जाऊ शकतो तेथे तुम्हाला तहानने मरावे लागणार नाही.

झेब्रा उंटासह जाऊ लागतो तेव्हा खूप गरम होते. झेब्राची प्रकृती ढासळू लागते. मग उंट त्याला त्याच्या विशाल शरीराच्या आवरणाखाली चालण्यास सांगतो. झेब्राला सूर्यापासून थोडासा दिलासा मिळतो. दोघे पुढे गेल्यावर वालुकामय वाळवंट जेथे वाळूचे वादळ वाहू लागतं. उंट म्हणतो, ''माझ्या मोठ्या पापण्यांमुळे मी अशा वाळूच्या वादळांचा सहज सामना करू शकतो. माझी त्वचा देखील जाड आहे, जी माझे सूर्य आणि वादळापासून संरक्षण करते.

थोडे पुढे गेल्यावर गरम वाळूमुळे झेब्राचे पाय जळू लागले. उंट गरम वाळूवर आरामात चालत असल्याचे पाहून विचारतो, ''तुला गरम वाळूवर चालणे कसे शक्य आहे?''

उंट म्हणाला, ''हे कुरूप खुर बघ. हे मला गरम वाळूवर चालण्यास मदत करतात. तुमचे पाय जळत असतील. मी तुला माझ्या पाठीवर बसवतो.''


उंटाने झेब्राला आपल्या पाठीवर बसवतो आणि पाण्याने भरलेल्या जागेवर येऊन म्हणतो, ''ही जागा पाण्याने भरलेली आहे. तुम्ही इथे आरामात राहू शकता.''

झेब्राने मदतीसाठी उंटाचे आभार मानतो आणि त्याच्या वागणुकीबद्दल माफी मागतो, ''मला माफ करा. तुला कुरूप समजून मी तुझ्याशी मैत्री केली नाही. मला माहित नव्हते की ज्या भागांना मी कुरूप म्हटले ते तुझे शारीरिक गुणधर्म आहेत आणि त्यामुळे तू वाळवंटात अगदी आरामात राहतोस.''

उंट झेब्राला माफ करतो आणि त्या दिवसापासून दोघेही चांगले मित्र बनतात.

तात्पर्य - सौंदर्य आणि दिसण्यावर जाऊ नका. कधी कधी कुरूप गोष्टीही उपयोगी पडू शकतात.

# रहमते दर्शन (भाग - १)



## वे सब कुछ जानते थे

प्रायः मेरी माता जी को मानसिक दौरे पड़ते रहते थे और सिवाय म हाराज जी के, वो थोड़ी देर के लिए सब कुछ भूल जाती थी। महाराज जी उसे बहुत प्यारे लगते थे। एक बार ऐसा ही दौरा पड़ा तो मैंने उसे मिलिट्री अस्पताल में भरती करा दिया। यहाँ आकर एक समस्या यह थी कि वो दवाइयाँ नहीं खाती थी। दो-चार दिन के उपचार के पश्चात जब उसकी छुट्टी होने वाली थी तो डॉक्टर की लिखी दवा लेने के लिए मैं मैडिकल स्टोर चला गया। वो अकेली रह गई । वापिस आकर देखा तो वो वहाँ नहीं थी। मैंने बहुत ढूँढा मगर नहीं मिली। अगले दिन भी मैंने तलाश की मगर कहीं उनका कोई अता-पता नहीं था। वास्तव में वो दवाई लेने के डर के कारण, अस्पताल से भाग कर हमारे घर, सोनीपत पहुँच गई, जिसका पता मुझे बाद में लगा। मैं निढाल और परेशान हो कर महाराज जी के पास पहुँचा। वहाँ पहुँचकर मैंने महाराज जी से पूरा वृत्तांत कह सुनाया और दया की भीख माँगी। महाराज जी ने सारी बात सुनने के बाद कहा, चिंता मत करो, वह ठीक है और घर पर है।

मुझे यकीन नहीं आया और महाराज जी की इस बात पर इस कारण से अमल नहीं कर सका कि न तो वह अकेली सोनीपत जा सकती थी और न ही उसके पास पैसे थे। कैसे सोनीपत जायेगी? मैं उसकी तलाश में फिर से भटकने लगा। लेकिन जिस प्रकार धूप और गर्मी से व्याकुल पथिक को केवल पेड़ की छाया का ही सहारा होता है, उसी प्रकार मुझे भी महाराज जी के अतिरिक्त कोई और सहारा सूझा ही नहीं। मैं थक हार कर फिर महाराज जी के पास पहुँचा और गुहार की कि महाराज जी! मेरी माँ को बचा लो। अब की बार महाराज जी ने मेरी मनोव्यथा समझकर मुझे माँ को किसी गुरुद्वारे में तलाश करने की सलाह दी।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

## दिमाग की शक्ती

अगर आप साहसिक कहानियां या वीर गाथायें हर रोज पढ़ना शुरू कर दें तो आप में आत्मविश्वास बढ़ जाएगा। आराम और स्मृति (ळ) किस किस को याद कीजिए, किस-किस को रोयें, आराम बड़ी चीज है, मुंह ढक कर सोएं, यह एक कहावत है। मस्तिष्क कभी भी नहीं थकता। जब मन में नकारात्मक विचार चलते हैं तो मस्तिष्क थक जाता है। जागते हुए जब कुछ सुनाई नहीं देता तब कुछ याद नहीं रहता, सोचने पर कुछ याद नहीं आता तब मान लिया जाता है कि मस्तिष्क थक गया है। कठोर कार्य या अत्यधिक श्रम से कोई भी थकान हो उसे नींद द्वारा खत्म किया जा सकता है। इस लिये जब भी अवकाश मिले आप आराम कर सकते हैं। स्मरण शक्ति का ह्रास थकान से होता है। थकान से शरीर की संघर्ष शक्ति क्षीण हो जाती है। जुकाम आदि अनेक बीमारियां रह रह कर परेशान करने लगती हैं। थकान की रोकथाम करके ही इन सब को कन्ट्रोल किया जा सकता है। हृदय निरन्तर कार्य करता है। हर धड़कन के बाद दिल आराम करता है। दिल प्रति मिनट ७० बार धडकता है। दिल २४ घंटो में केवल ९ घंटे काम करता है और १५ घंटे आराम करता है। चर्चिल १६ घंटे हर रोज कार्य करते थे। वह प्रति दिन सुबह ११ बजे तक बिस्तर पर लेटे लेटे ही काम करते थे। आराम का आराम और का काम। दोपहर के बाद चर्चिल दुबारा एक घंटे के लिये सो जाते थे। संध्या का भोजन करने के पूर्व वह फिर २ घंटे के लिये सो जाते थे।

थकान मिटाने के लिये उन्हें प्रयास नहीं करना पड़ा। उन्हो थकान को कभी पास फटकने नहीं दिया। जब भी समय मिलता वो सो जाते थे। राक फेलर दोपहर को आधा घंटा सो जाते थे। केवल ५ मिनट की झपकी भी थकान उतार देती है। थकने के पूर्व ही आराम कीजिए । एडिसन जब चाहता था सो जाता था। बैठ सकने का अवसर हो तो वह कभी खड़ा नहीं रहता था । यदि लेट सकने का अवसर हो तो वह कभी बैठता नहीं था। एक कालेज के अध्यक्ष पलंग पर लेट कर विद्यार्थियों से भेंट करते थे।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

## सूतिकेचा आहार

सुतिकेचा आहार-विहार तसेच शारीरिक व मानसिक स्थिती यावर स्तन्यउत्पत्ता असते; म्हणून सूतिकेचे मन प्रसन्न, आनंदी राहील याची काळजी घ्यावी. क्रोध, शोक, प्रवास, शारीरिक कष्ट, दिवास्वाप (दिवसा झोपणे), वाऱ्यामध्ये जाणे, प्रकाश, वारा यांचे अंगावर घेणे, चुकीचा आहार घेणे या गोष्टी टाळाव्यात. या सर्व गोष्टींमुळे वात प्रकोप असतो व त्यामुळे सूतिकेची त्वचा रुक्ष होऊन ताप येणे, सांधे जखडणे, केस गळणे, वजन वाढून बांधा बिघडणे, संधीवात, आमवात, कंबर, पाठदुखी विकार जडतात. ते बाळ अंगावर पीत असताना सूतिकेचे मन आनंदी व प्रसन्न ठेवावे. बाळंतपणानंतर शरीराची झीज झालेली असते. तसेच प्रसूतीनंतर योनीभाग नाजूक झालेला असतो; म्हणून किमान दीड महिना शारीरिक संबंध येऊ न देणेच हितावह असते. पंख्याची हवा घेणे, अथवा कुलरमध्ये बसणे, थंड पाण्याने आंघोळ करणे, भांडी धुणे, कपडे धुणे, फरशी पुसणे व अति काळजी करणे; यामुळे प्रकुपित झालेला वातदोष अधिकच प्रकुपित होतो व त्यामुळे वात व्याधी उद्‌भवतात. बाळंतपणानंतर ३ ते ४ महिने सूतिका परिचर्या पाळणे जरुरीचे असते. सव्वा ते दीड महिना डोक्याला स्कार्फ बांधणे, कानात कापसाचे बोळे ठेवणे जरुरीचे असते. तीन महिन्यानंतर सूतिकेने शरीराचा बांधा सुस्थितीत येण्यासाठी तसेच कंबर, पाठदुखी टाळण्यासाठी योगासने करणे जरुरीचे असते. योगासनांमुळे शरीरातील अतिरिक्त वाढलेला मेद कमी होऊन शरीराचे बल वाढविण्यास मदत होते. तसेच स्त्रीचे शारीरिक व मानसिक आरोग्य व्यवस्थित राहून हॉर्मोन्सचे प्रमाण प्राकृत राहण्यास मदत होते. संपूर्ण गर्भावस्थेत स्त्रीचे वजन १२ ते १४ किलोने वाढलेले असते. प्रसूती झाल्यानंतर ५ ते ६ किलोने वजन लगेच कमी होते.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# महाराष्ट्र केसरी स्पर्धेत आयोजक अहिल्यानगरच्या निमंत्रित संघाच्या समावेशास राज्य कुस्तीगीर संघाची मान्यता




नगर – महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत आयोजकांच्या निमंत्रित संघाचा सहभागा व्हावा यासाठी राज्य संघटनेकडे मागणी किली होती. त्यानुसार राष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाने म हत्त्वाचा निर्णय घेत अहिल्यानगरमध्ये होणाऱ्या ६७ व्या वरिष्ठ राज्य अजिंक्यपद महाराष्ट्र केसरी स्पर्धेमध्ये अहिल्यानगर जिल्हा कुस्तीगीर संघाकरिता स्पर्धा आयोजक म्हणून मुख्य संघाव्यतिरिक्त स्वतंत्र निमंत्रित संघ स्पर्धेत खेळवण्यास परवानगी देण्यात आली आहे. या मान्यतेचे पत्रही राज्य सचिव पै.योगेश दोडके यांनी जिल्हा कुस्तीगीर संघाला दिले आहे. त्यामुळे जिल्ह्याचे दोन संघ महाराष्ट्र केसरी स्पर्धेसाठी निवडण्यात येणार आहेत. यासाठी जिल्हा निवड चाचणी नगर तालुका कुस्तीगीर संघ आणि अक्षय कर्डिले युवा प्रतिष्ठाण यांच्या संयुक्त विद्यमाने २५ जानेवारी रोजी होणार आहे, अशी माहिती जिल्हा कुस्तीगीर संघाचे सचिव प्रा. डॉ.संतोष भुजबळ यांनी दिली

६७ वी वरिष्ठ राज्य अजिंक्य महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचे यजमानपद अहिल्यानगर जिल्ह्यास मिळाले आहे. २९ जानेवारी पासून सुरु होणाऱ्या या स्पर्धेच्या माध्यमातून कुस्तीचा प्रचार व प्रसार मोठ्या प्रमाणात होण्यासाठी स्पर्धेचे संयोजक व कुस्तीगीर संघाचे जिल्हाध्यक्ष आ.संग्राम जगताप प्रयत्नशील आहेत. यासाठी महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत आयोजकांचा स्वतंत्र निमंत्रित संघास खेळण्यास राज्य कुस्तीगीर संघाने परवानगी द्यावी, अशी मागणी अहिल्यानगर जिल्हा कुस्तीगीर संघाचे जिल्हाध्यक्ष आ.संग्राम जगताप यांनी राज्य संघटनेकडे करून वारंवार पाठपूराठा केला होता.

या स्पर्धेसाठी जिल्ह्याची निवड २५ जानेवारीला होणार असून अहिल्यानगर जिल्ह्यातील कुस्तीगिरांनी या निवड चाचणीत सहभागी व्हावे. ही निवड चाचणी राज्य कुस्तीगीर संघाने ठरवून दिलेल्या नियमांनी व वजन गटांमध्ये होणार आहे. २८ डिसेंबर रोजी श्रीरामपूर येथील सरला बेट येथे निवड झालेल्या कुस्तीगीरांना सदर निवड स्पर्धेमध्ये कोणत्याही सबबीवर सहभाग घेता येणार नाही, अशी माहिती जिल्हा कुस्तीगीर संघाचे उपाध्यक्ष पै. अर्जुन शेळके यांनी दिली. या निवड चाचणीसाठी महाराष्ट्र केसरी पै. शिवाजी शिर्के, संघाचे जिल्हा उपाध्यक्ष पै. रवींद्र वाघ, सह सचिव पै. प्रविण घुले, खजिनदार शिवाजी चव्हाण, महाराष्ट्र केसरी पै. गुलाब बर्डे, उप महाराष्ट्र केसरी पै. बबन काशीद, उप महाराष्ट्र केसरी बापू थेटे, पै. पांडुरंग गुंजाळ, पै. शिवाजी कराळे, उत्तर महाराष्ट्र केसरी पै. युवराज करंजुले, पै. उमेश भागानगरे आदी प्रयत्नशील आहेत.

# नगर शहरामध्ये २ फेब्रुवारी रोजी जिल्हास्तरीय सबज्युनिअर अ‍ॅथलेटिक्स मैदानी स्पर्धेचे आयोजन



नगर – अहमदनगर जिल्हा अ‍ॅथलेटिक्स असोसिएशनच्या वतीने जाहीर करण्यात आलेली जिल्हास्तरीय सब ज्युनिअर अ‍ॅथलेटिक्स मैदानी स्पर्धा २ फेब्रुवारी रोजी महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी क्रीडा भवन येथे होणार आहे. यामध्ये खेळाडूंना सहभागी होण्याचे आवाहन संघटनेचे प्रा.आर.पी. डागवाले, प्रा. सुनील जाधव, दिनेश भालेराव व राजेंद्र कोतकर यांनी केले आहे.

ही मैदानी स्पर्धा ८, १०, १२ व १४ वर्ष वयोगटातील मुला–मुली मध्ये रंगणार आहे. सकाळी ९.३० वाजता स्पर्धेला प्रारंभ होणार असून, यामधील प्रथम तीन क्रमांकाच्या खेळाडूंना गुणवत्ता प्रमाणपत्र व मेडल दिले जाणार आहे. तर सहभागी झालेल्या सर्व खेळाडूंना प्रमाणपत्र मिळणार आहे. ८, १०, १२ व १४ वयोगटातील प्रथम तीन क्रमांकाच्या विजेत्या खेळाडूंची राज्यस्तरीय सब ज्युनिअर मैदानी स्पर्धेसाठी निवड केली जाणार आहे. हे खेळाडू अहमदनगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार असून, ही स्पर्धा २१ फेब्रुवारी रोजी पंढरपूर (जि. सोलापूर) येथे होणार आहे.

सर्व खेळाडूंनी ऑनलाईन पद्धतीने https://www.smrsports.in/athletic/registration/1737102217fjYrjBVd89bdWNQybTjzRlpkusiWoo7D या संकेत स्थळावर किंवा क्यूआर कोड स्कॅन करुन अर्ज भरुन प्रवेशिका जमा करता येणार आहे. प्रवेशिका जमा करण्याची अंतिम तारीख ३० जानेवारी आहे. स्पर्धेला येताना मुळ जन्म दाखला व आधार कार्ड सोबत घेऊन येण्याचे सांगण्यात आले आहे. ही स्पर्धा फक्त अहमदनगर जिल्ह्यातील खेळाडूंसाठी आहे जिल्ह्याच्या बाहेरील खेळाडूंना प्रवेश नाकारण्यात येणार आहे.




उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे चषक इंडियन ओपन रिपब्लिक कप कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेत विजयी संघाचा ट्रॉफी देवून गौरविण्यात आले.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे चषक इंडियन ओपन रिपब्लिक कप कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेचा समारोप

### सलग दुसऱ्यांदा महाराष्ट्र संघाने पटकाविले विजेतेपद, कर्नाटक द्वितीय तर राजस्थान राहिले तृतीय स्थानी

नगर – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे चषक इंडियन ओपन रिपब्लिक कप कराटे चॅम्पियनशिप २०२५ स्पर्धा शहरात उत्साहात पार पडली. वाडियापार्क क्रीडा संकुल येथे झालेल्या या स्पर्धेत महाराष्ट्रासह इतर राज्यातून खेळाडूंचा सहभाग लाभला. सलग दुसऱ्यांदा महाराष्ट्र संघाने विजेतेपद मिळवत आपले वर्चस्व सिद्ध केले. कर्नाटक दुसऱ्या क्रमांकावर राहिला, तर राजस्थानने तिसरे स्थान मिळवले.

शिवसेना, युथ कराटे फेडरेशन, स्पोर्टस् ओके व अहिल्यानगर रुरल अ‍ॅण्ड अर्बन कराटे असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. रविवारी रात्री उशीरा या स्पर्धेचा समारोप पार पडला. विजेत्या खेळाडूंसह संघांना पारितोषिक प्रदान करण्यात आले. महाराष्ट्राच्या संघाला ५१ हजार रुपये रोख व चषक देवून गौरविण्यात आले. तर प्रत्येक गटातील विजेत्यांना ५ हजार रोखचे बक्षीस देण्यात आले.

शिवसेनेचे शहर प्रमुख सचिन जाधव, कराटे असोसिएशनचे सबील सय्यद आणि साहिल सय्यद यांनी खेळाडूंचे अभिनंदन करुन त्यांना शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्र संघाने प्रथम क्रमांक पटकावला, विजेत्या संघाला ५१ हजार रुपये रोख रक्कम व आकर्षक ट्रॉफी प्रदान करण्यात आली. प्रत्येक वयोगटातील विजेत्यांना ५ हजार रुपयांची रोख बक्षिसे देण्यात आली.

८, १०, १२, १४, १८ वर्षाखालील आणि १८ वर्षावरील विविध वजनगटांतील लढतीने प्रेक्षकांची मने जिंकली.

# राज्य मर्दानी युद्धकला व बोथटी चॅम्पियनशिपमध्ये अहिल्यानगर तृतीय



राज्य मर्दानी युद्धकला व बोथटी चॅम्पियनशिपमध्ये उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या अहिल्यानगरच्या खेळाडूंचा पारितोषिक, प्रमाणपत्र व पदक देऊन गौरव करण्यात आला.

नगर – नाशिकच्या चेतनानगर येथील डॉ. आर. एम. भागवत सभागृहात नुकतीच एक दिवसीय पहिली राज्यस्तरीय मर्दानी युद्धकला स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत अहिल्यानगरच्या संघाने राज्यस्तरीय तृतीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. संघाचे नेतृत्व कु. शुध्दीती दरेकर व कु.प्राप्ती वाळुंजकर यांनी केले होते. या स्पर्धेमध्ये राज्यातून अहिल्यानगर, सातारा, नाशिक, येवला आदी विविध जिल्ह्यातील संघ सहभागी झाले होते.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून नाशिकच्या औदुंबर भक्त मंडळ ट्रस्टचे अध्यक्ष भूषण काळे, श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे अहिल्यानगर जिल्हा प्रमुख बापु ठाणगे,' अशी फाउंडेशन आणि वेलफेयर ऑफ ह्युमॅनिटी' या संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा रसिका गायकवाड आदी उपस्थित होते. स्पर्धेच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्राचे शिवसेना उपनेते व ऊर्जा युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष अजय बोरस्ते होते. विजेत्या संघांचा पारितोषिक, प्रमाणपत्र व पदक देऊन गौरव करण्यात आला.

या स्पर्धेचा निकाल असा : विजेता संघ प्रथम क्रमांक : नाशिक जिल्हा द्वितीय क्रमांक : सातारा जिल्हा, तृतीय क्रमांक : अहिल्यानगर जिल्हा.

उंटवाडी नाशिकच्या प्राथमिक विद्या मंदिरच्या मुख्याध्यापिका सौ. उदावंत व श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे अहिल्यानगर जिल्हा प्रमुख बापु ठाणगे यांच्या हस्ते दिप प्रज्वलन, प्रतिमा व शस्त्र पूजन करून स्पर्धेची सुरुवात करण्यात आली.

या प्रसंगी स्पर्धेचे आयोजक, महाराष्ट्र सचिव व प्रधानाचार्य परीश्रृत क्षीरसागर, शिवसेनेचे अमोल जाधव, सह्याद्री युवा मंडळाचे अध्यक्ष अमेय जाधव, वामसा हर्बल्सचे संचालक निलेश परदेशी, नाशिक महानगरपालिकेचे उपायुक्त (अतिक्रमण विभाग) डॉ. मयूर पाटील, वीरशैव लिंगायत सभा नाशिकचे जिल्हाध्यक्ष अजिंक्य हिंगमिरे, रोहित येलमामे, विशाल पाटील, प्रशिक्षक सुरज भुसारी, अक्षय खिल्लारी, सुरज देवरे, अ‍ॅड. राहुल मेटकर यासह पालक, युवक उपस्थित होते. शेवटी संस्थेच्या वतीने मर्दानी युद्धकला खेळाचे थरारक प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. विजेत्या स्पर्धकांचे व संयोजकांचे बापू ठाणगे यांनी अभिनंदन केले व आभार मानले.

# पुण्यात २६ जानेवारीला ब्राम्हण वधू-वर मेळाव्याचे आयोजन


नगर – लग्न करू इच्छिणाऱ्या कोणीही अजिबात चुकवू नये असा कार्यक्रम रंग लग्नाचे, लग्नापूर्वी जाणण्याचे... एक अभिनव प्रयोग : कांदे – पोहे वधु–वर थेट–भेट, परिसंवाद २६ जानेवारी रोजी दुपारी २ ते ७ या वेळेत आयोजित करण्यात आला आहे. वधू–वर नोंद करुन उपस्थिती निश्चित करा. हे संमेलन नि:शुल्क असणार आहे. या संमेलनात फक्त वधू–वर अपेक्षित आहेत.

पालक, मित्र–मैत्रिण, तसेच नातेवाईक यांना प्रवेश नाही. जास्तीत जास्त ब्राम्हण विवाहेच्छुक तरुण व तरुणींनी सहभाग घेऊन हे संमेलन यशस्वी करावे. एकुण मुलामुलींची संख्या बघता जास्तीत जास्त मुलींचा सहभाग अपेक्षित आहे, असे आवाहन माजी जिल्हा न्यायाधीश चंद्रचूड गोंगले यांनी केले आहे.

हा मेळावा अय्यप्पा मंदिर, न्यू कोपरे, उत्तम नगर, विठ्ठल मंदिर समोर, शिवणे, पुणे येथे होणार आहे. मुलांच्या नोंदणीसाठी https://forms.gle/4dsGiTFC8gBAj2yGA, व मुलींसाठी https://forms.gle/ScSRfAunTNH3o6Rq8 या लिंकचा वापर करावा.

# २४ जानेवारीपासून पुण्यात निरंकारी संत समागमात मानवतेचा महासंगम

### नगर क्षेत्र व जिल्ह्यातून १० हजारहून अधिक भाविकांचा सहभाग




नगर– महाराष्ट्राचा ५८ वा वार्षिक निरंकारी संत समागम पिंपरी, पुणे येथील मिलीटरी डेरी फार्मच्या सुमारे ४०० एकर हून अधिक विशाल मैदानावर २४ जानेवारीपासून ३ दिवसीय संत समागमाचे आयोजन करण्यात आले असून यात देशभरातील लाखो निरंकारी भक्तगण तसेच विदेशातील अनेक ठिकाणाहून ही भाविक येणार असून मंडळाच्या अहमदनगर क्षेत्रामधील सहा जिल्ह्यातील अंदाजे दहा हजारहून अधिक भाविक– भक्तगण बुधवार पासून समागमासाठी रवाना होणार असल्याची माहिती मंडळाचे नगर क्षेत्र प्रमुख हरीश खूबचंदानी यांनी दिली.

खूबचंदानी म्हणाले की समागमाच्या पहिल्या दिवशी सकाळी सद्गुरु माता सुदिक्षाजी महाराज व राजपिता रमितजी यांना सुसज्जित वाहन (रथामधून) शोभायात्राद्वारे मुख्य सत्संग पंडाल पर्यंत आणले जाईल यावेळी अनेकतेतून एकतेचे विहंगम दृश्य पाहण्यास मिळेल यात देशाच्या कानाकोपऱ्यातून पारंपारिक वेशभूषा धारण केलेले भक्तगण आपली कला सद्गुरू समक्ष सादर करतील. सत्संग चा मुख्य कार्यक्रम तिन्ही दिवशी दुपारी २ वाजता सुरू होईल ज्यात अनेक वक्ते, गीतकार, कवीजन, सद्गुरु आणि ईश्वरा प्रति आपल्या मनातील भावना व्यक्त करतील व तिन्ही दिवस सत्राच्या शेवटी रात्री ९ वाजता सद्गुरु माता सुदिक्षाजी महाराज यांचे अमृततुल्य, मार्गदर्शनपर प्रवचन होतील. दरम्यान समागमच्या दुसऱ्या दिवशी सकाळच्या सत्रात निरंकारी सेवादलाच्या महिला व पुरुष सदस्यांची अशी रॅली होईल यात सेवादल कवायती व सेवेप्रति नाटिका सादर करून सद्गुरूंचे आशीर्वाद प्राप्त करतील. समागमाच्या तिसऱ्या दिवशी सायंकाळच्या सत्रात बहुभाषिक कवी संमेलन पार पडेल.

समागमात सहभागी होणाऱ्या सर्व भक्तगणांसाठी व्यापक स्तरावर निवासी तंबू, लंगर, कॅन्टीन, दवाखाने, सुरक्षा व्यवस्था, पाणी, अत्यावश्यक सुविधांची यथोचित व्यवस्था करण्यात आली आहे. प्रकाशन स्टॉल्स, मुख्य आकर्षण असलेली 'निरंकारी प्रदर्शनी', 'बाल प्रदर्शनी' तयार केली आहेत. निरंकारी मिशनच्यावतीने मानवतेच्या या महामेळाव्यासाठी समस्त भाविक बंधू भगिनींना आमंत्रित करण्यात येत आहे. त्यांनी या संत समागमात सहभागी होऊन जीवन सार्थक करावे.



ई जागृती रजीस्ट्रेशनच्या डेमोस्ट्रैशनला जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग वकील संघटना अध्यक्ष व सचिवांच्या अवाहनाला प्रतिसाद देऊन थोडेच सभासद व पदाधिकारी हजर होते. टिम लिडर कल्याणी व अंकिता औटी लॉ स्टूडंट अध्यक्षांच्या विनंतीनुसार परगावाहून वेळेवर कंझूमर बारमध्ये हजर झाल्या. सहसचिव अ‍ॅड. सौ. अरूणा राशीनकर यांनी त्यांचे स्वागत केले. त्यांनी उपस्थित सभासदांना विस्तृत प्रमाणात सचित्र माहिती समजावून सांगितली. सचिव अ‍ॅड. साहेबराव चौधरी पाटील यांनी त्यांचे आभार मानले व तीळगुळाचे वाटप करून बैठक झाली. याकामी अ‍ॅड. शितल रनशोना व चि.मुंदडा यांनी याकामी सहकार्य केले.



जगभरात १४३ देशात ध्यानधारणा शिकविणाऱ्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या वरिष्ठ राजयोग शिक्षिका ब्रह्माकुमारी तपस्विनी व ध्यानधारणा प्रशिक्षक बी के डॉ. दीपक हरके यांनी मिसेज इंडिया ग्लोब २०२४ अनुराधा गर्ग यांची मुंबईत भेट घेतली. यावेळी वरिष्ठ राजयोग शिक्षिका बी के तपस्विनी दीदी यांनी संस्थेद्वारा जगभरात शिकविल्या जाणाऱ्या राजयोग ध्यान पध्दती बद्दल माहिती देऊन संस्थेच्या आंतरराष्ट्रीय मुख्यालय माऊंट आबूला भेट देण्याचे निमंत्रण दिले.

# नगरमध्ये भारत भारतीतर्फे २६ जानेवारीला राष्ट्रभक्तीपर त्रिवेणी कार्यक्रम

### मीनाक्षी सहरावत व मदन सुंदरदास यांच्या व्याख्यानांचे आयोजन





नगर – भारत भारती संस्थेच्या वतीने नगर शहरात गेल्या १३ वर्षांपासून देशाच्या प्रजासत्ताक दिनानिमित्त देशभक्तीपर व्याख्यान, विविध राज्यांच्या लोक नृत्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम व देशातील सर्व राज्यांची खाद्य संस्कृतीचे फूड फेस्टिव्हल अशा त्रिवेणी संगम असलेल्या उपक्रमाचे आयोजन केले जात आहे. याही वर्षी २६ जानेवारी रोजी सायंकाळी ५.३० वाजता मनमाड रोडवरील हॉटेल संजोग लॉन येथे या त्रिवेणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षी होणाऱ्या कार्यक्रमात सनातन महासंघ व वैदिक मिशनरीच्या संस्थापिका मीनाक्षी सहरावत यांचे समाज जनजागृती व समाज संघटनमध्ये महिला व युवकांची भूमिका या विषयावर व्याख्यान होणार आहे. यावेळी इस्कॉनचे प्रेरणादायी वक्ते मदन सुंदरदास (प्रभू जी) कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी असणार असून प्रमुख पाहुणे स्पेशल ऑलिम्पिकच्या अहिल्यानगरच्या चेअरमन धनश्री विखे व केरळ प्रांतातील भारत भारतीचे अध्यक्ष हृदयरोग तज्ञ डॉ.आर.विजयकुमार उपस्थितीत राहणार आहेत. यावर्षीचा कार्यक्रम पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या ३०० व्या जयंतीस समर्पित करण्यात आला आहे, अशी माहिती अध्यक्ष कमलेश भंडारी यांनी दिली.

यावर्षी होणाऱ्या कार्यक्रमातील प्रमुख वक्ते मीनाक्षी सहरावत या प्रभावी वक्तृया म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांचे देशभक्तीपर वरील अनेक भाषणे गाजलेली आहेत. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष मदन सुंदरदास (प्रभू जी) हे श्रीमद् भगवत गीतेचे गाढे अभ्यासक असून त्यांचे भगवत गीतेचे प्रवचने गाजलेली आहेत. भारत भारती आयोजित या कार्यक्रमास नगरमधील हजारो नागरिकांचा प्रतिसाद मिळत असतो.

राष्ट्रभक्तीने भरलेल्या या कार्यक्रमा निमित्त फूड फेस्टीव्हलचेही आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये भारतातील सर्व राज्यांचे वैशिष्ट्य असलेल्या खाद्य पदार्थांचा आस्वाद नागरिकांना घेता येणार आहे. तसेच शहरातील विविध शाळेतील विद्यार्थी, विविध ग्रुपचे कलाकार देश भक्तीपर व विविध राज्यांचे पारंपारिक सांस्कृतिक नृत्य सादर करणार आहेत. भारत भारतीच्या या उपक्रमातून बौद्धीक, सांस्कृतिक व खाद्य अशा त्रिवेणी संगम असलेल्या कार्यक्रमाची पर्वणी मिळणार असल्याने या कार्य्कर्माची नागरिक अतुरतेने वाट पाहत असतात, अशी माहिती उपाध्यक्ष रमेश रासने यांनी दिली.

या त्रिवेणी कार्यक्रमाचा नागरिकांनी लाभ घेऊन फूड फेस्टीव्हलचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन भारत भारतीच्यावतीने करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजाभाऊ मुळे, वाल्मिक कुलकर्णी, प्रदीप पंजाबी, के के शेट्टी, राजेंद्र अगरवाल, मिलिंद कुलकर्णी हे मार्गदर्शन करत आहेत. भारत भारतीचे प्रोजेक्ट चेअरमन सतीश गवळी व युवराज पोटे, उपाध्यक्ष समीर बोरा, सेक्रेटरी संदीप कोद्रे, चिराग शाह, खजिनदार हिरालाल पटेल, हरिश हरवानी. अशोक मवाळ, राजू लक्ष्मण, यांच्यासह महिला विभागाच्या अध्यक्षा विनया शेट्टी, उपाध्यक्षा स्वीटी पंजाबी, सेक्रेटरी विनिता छाब्रिया, मयूरा कोद्रे, खजिनदार मीना हरवानी, संघटन प्रमुख श्रेया देशमुख आदी प्रयत्नशील आहेत.

फूड फेस्टीव्हलच्या स्टल बुकिंग करिता समीर बोरा ९८२२४१७७७७ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये २४ जानेवारीला मोफत कॅन्सर तपासणी शिबिराचे आयोजन



नगर – जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे २४ जानेवारी रोजी मोफत कॅन्सर तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० ते दुपारी २ यावेळेत होणाऱ्या या शिबिरात कॅन्सर सर्जन डॉ.अनिकेत शिंदे रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करतील. हॉस्पिटलमध्ये कॅन्सरवर अत्याधुनिक उपचार सुविधा उपलब्ध असून जास्तीत जास्त रूग्णांना त्याचा लाभ मिळवून देण्यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरात तोंडाचा, स्तनाचा, फुफ्फुसाचा, आतडे, लिव्हर, स्वादुपिंड, गर्भाशय इत्यादी कॅन्सर तपासणी करण्यात येईल. हॉस्पिटलमध्ये रेडिएशन थेरपी आणि केमोथेरपी उपचार व मार्गदर्शन उपलब्ध आहे. कॅन्सरचे वेळीच अचूक निदान झाल्यास रूग्ण पूर्ण बरा होवू शकतो. यासाठी योग्य तपासणी व निदान महत्वाचे असते. त्यादृष्टीने शिबिरात रूग्णांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

हॉस्पिटलमध्ये हायटेक पॅथोलॉजी लॅब व ३५ अत्याधुनिक डायलेसिस मशीनव्दारे सेवा उपलब्ध आहे. डिजिटल एक्स रे २५० रुपये, सोनाग्राफी कलर प्रिंट व रिपोर्टसह ८०० रुपये, सिटी स्कॅन १२५० रुपये तर एमआरआय २५०० रुपयांत केले जाते. याशिवाय आनंदऋषीजी ब्लड बँक सेवा २४ तास उपलब्ध आहे. शिबिराचा रूग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क – ०२४१–२३२०४७३/७४/७५/७६



कथाकथन स्पर्धात ब्ल्यू डायमंड स्कूलच्या विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले.

# कथाकथन स्पर्धात ब्ल्यू डायमंड स्कूलचे यश

नगर – हिंद सेवा मंडळाच्या पेमराज सारडा महाविद्यालयात 'कथाश्री करंडक आंतरशालेय कथाकथन' स्पर्धा झाल्या. यात ब्ल्यू डायमंड स्कूलच्या विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले. शाळेतील ४ विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग घेतला. त्यापैकी ९ वीच्या साईनाथ राजकुमार पाल याने तृतीय क्रमांक पटकावला. त्याला कार्यक्रमाचे अध्यक्ष व कलाकार प्रवीण कुलकर्णी, निमंत्रक व नाट्य कलाकार प्रसाद बेडेकर यांच्या हस्ते गौरवचिन्ह व प्रशस्तिपत्रक देऊन गौरविण्यात आले.

विद्यार्थ्यांना प्राचार्य सुजित डोंगरे, उपप्राचार्या शारदा शेळके, सर्व शिक्षक व मराठी विषयाच्या शिक्षिका सारिका पडोळे यांचे मार्गदर्शन लाभले.

# माळी समाजाचा २३ फेब्रुवारीला राज्यस्तरीय वधू-वर मेळावा

नगर – माळी समाजाचा सर्व शाखीय राज्यस्तरीय वधू–वर व पालक परिचय मेळावा २३ फेब्रुवारी रोजी छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे आयोजित करण्यात आला आहे.


सर्व शाखीय माळी समाजाचा २५ वा राज्यस्तरीय वधू–वर व पालक परिचय मेळावा संत सावता सुमन वधू–वर संस्थेमार्फत आयोजित केला आहे. 'हनुमान मंदिर सभागृह', श्रीरामनगर, सिडको, एन–२, धूत हॉस्पिटलजवळ, जालना रोड, जि. छत्रपती संभाजीनगर येथे सकाळी ११ ते ५ या वेळेत हा मेळावा होत आहे.

मेळाव्याचे अध्यक्ष श्रीमती रमाबाई गजमल माळी व स्वागताध्यक्ष व आयोजक ओ.बी.सी. कल्याण, दुग्ध विकास व नवीकरणीय उर्जा मंत्री अतुल सावे आहेत. राज्यस्तरीय वधू–वर मेळाव्यासाठी व सावता सुमन २०२४ पुस्तिकेसाठी नाव नोंदणी प्रसाद प्रभाकर नन्नवरे, घर नं. ७४२१, वाघुले बिल्डींग, ब्राह्मणगल्ली, माळीवाडा, अहमदनगर, मो.नं. ९४२३४६३२४९ किंवा सौ. संगिता हरिभाऊ पवार, रामनगर, एन–२, सिडको, घर नं. एल–१–१५–२, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मो.नं. ७७२१९५२२२२ येथे ३१ जानेवारी पर्यंत संपर्क साधावा, असे आवाहन अध्यक्षा संगिता पवार यांनी केले आहे.

# एआय क्षेत्रातील नवा तारा

**रोनक कुमार हे नावीन्यपूर्ण विचारसरणी असणारे आणि त्यांच्या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणारे एक उदयोन्मुख व्यक्तिमत्त्व आहे. त्यांनी डेटा ॲनालिटिक्स, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट आणि एआय सारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा कामामध्ये एकत्रितपणे उत्कृष्ट उपयोग केला आहे. यशस्वी वाटचालीमुळे ते अनेकांसाठी प्रेरणास्थान ठरत आहेत.**

सरत्या वर्षात ३० डिसेंबर २०२४ रोजी इस्रोच्या पीएसएलव्ही सी६० ने श्रीहरिकोटा येथून एमओआय-टीडी(माय ऑर्बिटल इन्फ्रास्ट्रक्चर टेक्नॉलॉजी डेमॉन्स्ट्रेटर) उपग्रह अवकाशात सोडला आणि यायोगे अंतराळात भारताची पहिली एआय प्रयोगशाळा सुरू केली. त्यामुळेच हा एक महत्त्वपूर्ण आणि या श्रेणीतील पहिला उपग्रह आहे. ङ्गआमचा हा फक्त कॅमेरा, सेन्सर आदींनी युक्त असणारा सामान्य उपग्रह नाही तर त्यात मोठे एआय मॉडेल चालवण्याची क्षमता आहे. त्याच्या कक्षेत एआय आधारित प्रयोगांची चाचणी घेण्यासाठी एआय अल्गोरिदम लिहिणे शक्य आहे म्हणूनच आम्ही त्याला अवकाशातील एआय लॅब म्हणतो, असे या प्रयोगात महत्त्वपूर्ण भूमिका असणारे टेकमी२स्पेसचे सीईओ आणि संस्थापक रोनक कुमार सामंत्रे सांगतात. तेव्हा आज आपण या अचिव्हरची ओळख करुन घेऊ या.



अवकाशातील या एआय लॅबमागील त्यांचे स्टार्ट-अप हैदराबादस्थित टेकमी२स्पेस हे आहे.

आपल्या प्रवासाविषयी बोलताना रोनक म्हणतात,ङ्गमी २००८ मध्ये संगणक विज्ञानात अभियांत्रिकी पूर्ण केले आणि मायक्रोसॉफ्टमध्ये सामील झालो. तेव्हा लाखो लोक वापरू शकतील असे काहीतरी तयार करणे हेच स्वप्न होते. त्यामुळेच २०११ मध्ये एक प्रकारचे ॲप्स युग सुरू झाल्यानंतर आपण यात काही करु शकलो असे मला वाटले आणि पहिले स्टार्टअप नाऊ फ्लोट्स सुरू केले. २०१९ पर्यंत भारतातील ४५ शहरांमध्ये आमचे काम विस्तारले होते. आम्ही भारतातील एमएसएमई-केंद्रित व्यवसायात तिसऱ्या क्रमांकाचा होतो. डिसेंबर २०१९ मध्ये आम्ही ते रिलायन्सने विकत घेतले.

रोनक कुमार पुढे सांगतात, तेव्हाच अवकाश क्षेत्रात काम करण्याचा विचार केला. मात्र आधी एक किलो पेलोड कक्षेत टाकण्यासाठी दहा लाख डॉलर्स खर्च येत असे. २०२१ मध्ये स्पेस एक्समुळे तो ४०,००० डॉलर्सवर आला. आता तर तो ६,००० डॉलर्स पर्यंत कमी झाला आहे. स्वाभाविकच रॉकेटची किंमतही कमी झाली. त्यामुळे मी अवकाशाकडे प्रभाव पाडण्याची चांगली संधी, म्हणून पाहू लागलो आणि ५० किलोग्रॅम इतके वजन असणाऱ्या नॅनो-उपग्रहांकडे लक्ष केंद्रित केले. त्यासाठी हैदराबादमधील राहत्या घरी सर्व उपप्रणाली बांधण्यास सुरुवात केली... अशाप्रकारे प्रारंभ झालेला त्यांचा प्रवास आज महत्त्वपूर्ण वळणावर पोहोचला आहे. रोनक कुमार हे नावीन्यपूर्ण विचारसरणी असणारे आणि त्यांच्या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणारे एक उदयोन्मुख व्यक्तिमत्त्व आहे. ते आधुनिक तंत्रज्ञान, व्यवसाय विकास आणि नेतृत्वगुणांमध्ये निपुण आहेत. त्यांनी डेटा ॲनालिटिक्स, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट आणि एआय सारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा आपल्या कामामध्ये एकत्रितपणे उत्कृष्ट उपयोग केला आहे. आपल्या ज्ञानाचा उपयोग करून नवीन कल्पना राबवण्याचा आणि समाजासाठी योगदान देण्याचा नेहमीच प्रयत्न राहील, असे ते सांगतात. अशा यशस्वी वाटचालीमुळे ते अनेकांसाठी प्रेरणास्थान ठरत आहेत.

**अचिव्हर**



## फंडू एसएमएस

माझंही
प्रेम राफेल विमानासारखं होतं...
शेवटपर्यंत तिला
किंमत कळलीच
नाही!

मंजिल का
मिलना न मिलना
सब किस्मत
की बाते होती है,
लेकिन हम कोशिश भी
न करे ये लगत बात है

कुछ लोग
पकोडों की तरह
होते हैं
जरा ध्यान
न दो तो जल जाते
हैं।

# गरमागरम मसाला पाव

**झटपट रेसिपी**

मित्रांनो, पावभाजी म्हटली की तोंडाला पाणी सुटतं. पण होस्टेलमध्ये पावभाजी करायला पुरेसा वेळ नसतो. त्यातच भाज्या चिरत आणि शिजवत बसायचा कंटाळा येतो. अशा वेळी तुम्ही चटपटा मसाला पाव बनवून खाऊ शकता.

साहित्य : लादी पाव, बटर, कांदा, टोमॅटो, भोपळी मिरची (सर्व बारीक चिरुन), ठेचलेलं लसूण, हळद, तिखट, गरम मसाला, मीठ, कोथिंबीर आणि लिंबू इत्यादी.

कृती: तव्यावर चमचाभर बटर घाला. त्यात कांदा आणि भोपळी मिरची परता. कांदा सोनेरी झाल्यावर त्यात लसूण, टॉमेटो, हळद, तिखट, गरम मसाला आणि मीठ घाला. दोन चमचे पाणी घालून शिजवून घ्या. अधून मधून हलवत रहा. आवडत असल्यास पावभाजी मसालाही वापरू शकता. आता हा तयार मसाला बाजूला ठेवा. त्याच तव्यावर पुन्हा थोडं बटर घाला. त्यावर आता केलेला थोडा मसाला घालून परता. आता पाव मध्ये कापून घ्या. हा मसाला पावात भरा. त्यावर कोथिंबीर भुरभुरा, लिंबू पिळा आणि पाव तव्यावर भाजून घ्या. मसाला पाव तयार आहे.



# मला असुरक्षित वाटतं

**मॅच मेकिंग**

मी २६ वर्षांचा तरुण असून सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम करतो. माझी २२ वर्षांची प्रेयसी नवोदित अभिनेत्री आहे. एक अभिनेत्री म्हणून तिला प्रणयदृश्य करावी लागतात. पण यामुळे मी खूप अस्वस्थ होतो. तिच्या मित्रमंडळींमधली बरीच मुलं स्मार्ट, हँडसम आहेत. ती सतत त्यांच्याशी माझी तुलना करत असते. मला स्वत:मध्ये सुधारणा करायला सांगते. कामात खूप व्यस्त असल्याने तिच्यासोबत फार वेळ घालवू शकत नाही. स्वत:लाही फार वेळ देऊ शकत नाही. त्यातच नवोदित अभिनेत्री असल्याने आमचं नातंही तिला उघड करायचं नाही. तिच्या अभिनेत्री असल्याचा आमच्या भविष्यावर परिणाम होईल का? लग्नानंतर परिस्थिती आणखी गंभीर बनेल का?



उत्तर : तुम्ही दोघं मनोरंजन क्षेत्रात काम करता. इथे तुम्हाला बराच वेळ गुंतवावा लागतो. त्यामुळे काम आणि वैयक्तिक आयुष्य यांचं संतुलन साधणं गरजेचं आहे हे आधीपासून लक्षात घ्या. प्रेयसीला प्रणयदृश्यं द्यावी लागत असल्याने तू अस्वस्थ आहेत. पण या क्षेत्राची ही गरज असल्याचं तुला माहीत आहे. मुळात नातं टिकवून ठेवण्यासाठी एकमेकांवर विश्वास हवा. तोच नसेल तर तुला कायमच असुरक्षित वाटत राहील. सर्वात आधी तुझी उद्दिष्ट निश्चित कर. प्रेयसीशी बोल. एकमेकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करा. तुम्ही दोघेही पंचविशीत आहात. या वयात आर्थिकदृष्ट्या सक्षम होणं, बस्तान बसवणं गरजेचं असतं. त्यामुळे आधी याचा विचार करा. नात्याला वेळ द्या. एकमेकांना समजून घ्या. गरज असेल तर समुपदेशकाचीही मदत घेता येईल. तुम्ही एकमेकांचे आधारस्तंभ व्हायला हवं. ही तयारी असेल तरच पुढे जा.

# मुलाखतीची तयारी

**वेगळ्या वाटा**

वर्षाच्या प्रारंभी नोकरीच्या नवीन संधी समोर येतात. तुम्हीही नोकरीसाठी मुलाखतीला जाण्याच्या तयारीत असाल तर काही महत्त्वाचे नियम अवश्य पाळा.


* संस्थेची माहिती घ्या: प्रथम मुलाखतीसाठी जाणार असलेल्या कंपनीबद्दल तपशीलवार माहिती गोळा करा. त्यांचे उद्दिष्ट, कार्यक्षेत्र आणि बाजारातील स्थान याविषयी माहिती असावी.
* भूमिकेचा अभ्यास करा: अर्ज केलेल्या पदासाठी लागणाऱ्या कौशल्यांची आणि जबाबदाऱ्यांची स्पष्ट कल्पना असावी.
* रेझ्युमे अपडेट करा: रेझ्युमे व्यवस्थित, आकर्षक आणि नेमका असावा. त्यात फक्त संबंधित माहिती समाविष्ट करा.
* स्वत:ची तयारी: यामध्ये प्रथम प्रश्नोत्तरांचा सराव करा. जसे की, प्रत्येक मुलाखतीमध्ये सर्वसामान्य प्रश्न विचारले जातात. तेव्हा तुमच्याबद्दल सांगा, तुम्ही ही भूमिका का निवडली? वा तुमच्या भविष्याच्या अपेक्षा काय आहेत? यासारख्या प्रश्नांची उत्तरे तयार ठेवा.




* प्रोजेक्ट आणि अनुभव स्पष्ट करा: पूर्वीच्या नोकऱ्यांमध्ये किंवा शिक्षणात केलेले प्रोजेक्ट्स, आव्हानांवर कशी मात केली आणि त्यातून घेतलेले धडे याविषयी माहिती द्या.
* योग्य वेशभूषा: मुलाखतीसाठी फॉर्मल आणि व्यवस्थित पोशाख घाला. उत्तम वेशभूषा तुमच्या व्यक्तिमत्वाची छाप उमटवते. खेरीज वेळेवर पोहोचा. आत्मविश्वासाने बोलण्याचा प्रयत्न करा आणि सौजन्यपूर्ण वर्तन ठेवा.
* शिष्टाचार: मुलाखतीच्या वेळी स्मितहास्य आणि डोळ्यात डोळे पाहून संवाद साधणे महत्त्वाचे असते. यातून आत्मविश्वास दिसतो आणि सकारात्मकता निर्माण करतो.
* शांतपणे ऐका: सर्वात महत्त्वाचे म्हणजे प्रश्न नीट ऐकून त्याला योग्य प्रतिसाद द्या. प्रश्न समजला नाही तर पुन्हा विचारायला अजिबात संकोच करू नका.
* मुलाखतीनंतरचा फॉलोअप: मुलाखतीनंतर संबंधित व्यक्तींना आभार व्यक्त करणारा ईमेल अवश्य पाठवा. याद्वारे तुमच्या व्यावसायिकतेची छाप पडते. थोडक्यात सांगायचे तर मुलाखतीच्या तयारीत प्रामाणिकपणा, योग्य शिष्टाचार आणि सकारात्मकता यांचे पालन केल्यास यशस्वी होण्याची शक्यता वाढते.

## ॲप वर्ल्ड

### याची माहिती ठेवा




नियमांनुसार एका आयडीवर नऊ सिम सक्रिय करता येतात. परंतु जम्मू-काश्मीर आणि आसामसह ईशान्येकडील राज्यांच्या आयडीवर फक्त सहा सिम सक्रिय होतील, हे तुम्ही जाणून घ्यायला हवे. आयडीवर तुम्ही वापरत नसलेले सिम सक्रिय झाले तर त्याचे परिणाम भोगावे लागू शकतात. उदाहरणार्थ, तुमच्या आयडीवर नोंदणीकृत सिम वापरून काही चुकीचे किंवा बेकायदेशीर काम करत असेल तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. त्यामुळेच तुमच्या आयडीवर किती सिम नोंदणीकृत आहेत हे जाणून घ्या.

## हाउ टू?

### आवाज वाढवायचाय?

फोन केल्यानंतर आपल्याला समोरच्या व्यक्तीचा आवाज नीट ऐकू येत नाही. हा आवाज तुम्ही वाढवू शकता. कसा? पाहू या.




* बरेचदा आपण मीडिया व्हॉल्यूम ऐवजी ईयरपीस व्हॉल्यूम कमी करतो. हा आवाज वाढवण्यासाठी फोनवर बोलताना व्हॉल्यूम वाढवावा लागेल.
* फोनवर बोलत नसताना आवाज वाढवायचा असेल तर सेटिंग्जमध्ये जा. त्यानंतर साउंडचा पर्याय निवडून मीडिया व्हॉल्यूम वाढवावा लागेल.
* नेटवर्कच्या समस्येमुळेही असं होतं. त्यामुळे नेटवर्क मोड ऑटोमॅटिकऐवजी मॅन्युअल करा. यामुळे आवाज स्पष्ट ऐकू येईल.

## स्मार्ट टिप्स


### ही महत्त्वाची घोषणा आहे

तुमच्याकडे विंडोज १० असणारा लॅपटॉप किंवा संगणक असेल तर लक्षात घ्या की मायक्रोसॉफ्टने विंडोज १० चा सपोर्ट बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. मायक्रोसॉफ्टने जाहीर केले आहे की, १० वर्षे जुनी ऑपरेटिंग सिस्टम विंडोज १०१४ ऑक्टोबर २०२५ रोजी निवृत्त होणार आहे. याचा अर्थ असा की कंपनी आता विंडोज १० वापरकर्त्यांसाठी मोफत सुरक्षा अपडेट्स जारी करणार नाही. त्यानंतर वापरकर्त्यांना नवीन सुरक्षा धोके, डेटा लीक आणि मालवेअर हल्ल्यांचा सामना करावा लागू शकतो. तेव्हा सावध व्हा.




## सोशल मिडिया

### क्विक शेअर



गुगलने त्यांच्या क्विक शेअर फीचरमध्ये एक नवीन क्यूआर कोड स्कॅनिंग फीचर सादर केले असून त्यामुळे अँड्रॉइड डिव्हाइसेसमध्ये फाइल शेअरिंग पूर्वीपेक्षा सोपे झाले आहे. या नवीन फीचरची घोषणा डिसेंबरमध्ये करण्यात आली होती आणि आता हळूहळू ती वापरकर्त्यांपर्यंत पोहोचत आहे. याअंतर्गत वापरकर्ते क्विक शेअर मेनूमधील क्यूआर कोड स्कॅन करून फाइल्स शेअर करू शकतात. यामुळे संपर्क सेव्ह करण्याची किंवा डिव्हाइसची आधीच पडताळणी करण्याची गरज नाहीशी होते. हे वैशिष्ट्य ब्लूटूथ आणि वाय-फाय डायरेक्टवर आधारित आहे. डेटा ट्रान्सफर दरम्यान फायल्स एन्क्रिप्टेड राहतात.


# ट्रेंडी कफलिंक्स

**फॅशन पॅशन**

मुलांच्या ॲक्सेसरीजमधला महत्त्वाचा घटक म्हणजे कफलिंक्स. स्टायलिश, ट्रेंडी कफलिंक्समुळे तुमचा लूक पूर्णपणे बदलून जातो. फॉर्मल सूटवर कफलिंक्स खूपच छान दिसतात. बाजारात विविध प्रकारचे, रंगाचे कफलिंक्स मिळतात. ही स्टाईल कशी कॅरी करायची याविषयी...

* फॉर्मल पार्टी किंवा लग्नाला सूट घालून जायचा विचार असेल तर त्यावर चौकोनी आकाराचे ब्लू डायमंड जडवलेले कफलिंक्स लावा.
* नाव किंवा आडनावाच्या पहिल्या अक्षराचे कफलिंक्स तयार करून घेऊ शकता. हा प्रकार खूप हटके दिसतो.
* महागड्या डिझायनर सूटवर लंबगोल कफलिंक्सचा पर्याय निवडा. यामुळे तुम्हाला स्टायलिश लूक मिळेल.
* बंदुकीच्या आकाराचे कफलिंक्स मिळतात. त्यांना शॉटगन कफलिंक्स असं म्हटलं जातं. हा प्रकारही खूप वेगळा आहे.
* गडद रंगाच्या सूटवर साजेसे कफलिंक्स हवेत. फ्लोरल डिझाइनचे सिल्व्हर कफलिंक्स यावर उठून दिसतील.
* कोणत्याही शर्टवर कॅरी करता येतील, असे कफलिंक्स तुमच्याकडे हवेत. गोल्ड आणि ब्लॅक कफलिंक्स कुठल्याही रंगाच्या शर्टबरोबर चालून जातील.
* फिकट रंगाच्या शर्टसोबत हिरवे कफलिंक्स कॅरी करा. ऑफिसमध्ये जाताना हा रंग खूपच भारी वाटेल.
* नेव्ही ब्लू कफलिंक्सही खूप छान दिसतात. मिक्स ॲण्ड मॅच करून तुम्ही ते वापरू शकता.






# गुगल मॅप्स वापरताना...

**लक्षात घ्या**

सध्या पत्ता शोधण्यासाठी गुगल मॅप्सचा वापर अनिवार्य झाला आहे. अनेकजण त्याच्या आधारे इच्छित स्थळी पोहोचतात. परंतु गुगल मॅप्सचा वापर करताना काही काळजी घेणे गरजेचे ठरते कारण ती घेतली नसल्याने घडलेल्या अपघातांची यादीही बरीच मोठी आहे. तेव्हा आज यावर चर्चा करु या.

* नकाशे वापरताना काळजी घ्या: गुगल मॅप्स बहुतेकदा योग्य माहिती देत असले तरी कधीकधी त्यावर अवलंबून राहणे धोकादायक ठरते. म्हणूनच प्रवासाला सुरुवात करण्यापूर्वी नकाशावर काही चुकीच्या घटना वा धोके घडत नसल्याची खातरजमा करुन घ्या.
* कधीकधी नकाशामध्ये नद्या, अज्ञात किंवा निर्जन रस्ते दिसत असले तरी लोक त्यानुसार पुढे जातात. परंतु असे करणे धोकादायक असू शकते.
* तुम्हाला नकाशा समजत नसेल तर स्थानिक लोकांची मदत घेण्याचा प्रयत्न करा. यासाठी काही मिनिटे वेळ लागेल, परंतु तुम्हाला योग्य माहिती मिळेल.
* नकाशाच्या नवीन वैशिष्ट्यांसह स्वतःला अपडेट ठेवणे खूप महत्त्वाचे आहे, त्यामुळे तुम्ही अडचणीत पडल्यास त्याआधारे मदत घेऊ शकाल.



* कुठेही बाहेर जाण्यापूर्वी नकाशा अपडेट करणेदेखील अत्यंत महत्वाचे आहे. लक्षात घ्या, नकाशावर आंधळेपणाने विश्वास ठेवणे योग्य नाही. तुम्ही गुगल मॅप्सची मदत घेऊ शकता पण त्यावर अवलंबून राहू शकत नाही. एखाद्या मोठ्या रस्त्यावरून प्रवास करत असाल तर नकाशा व्यवस्थित काम करतो. परंतु इंटरनेटची सेवा व्यवस्थित नसेल, नेटवर्क पिअर असेल तर गुगल मॅप्स तुम्हाला त्रास देऊ शकतात. म्हणूनच नेहमी चांगले इंटरनेट कनेक्शन ठेवा.

# गिर्यारोहणाला जाताना...

**भटकंती**

बरीच मंडळी गिर्यारोहण करतात. हा एक धाडसी क्रीडाप्रकार आहे. भारतात अनेक पर्वतरांगा आहेत. त्यावरची चढाई काही तरी वेगळं केल्याचा आनंद मिळवून देते. छोट्या ट्रेक्सने सुरूवात करून तुम्ही या क्षेत्रात मोठी मजल मारू शकता. गिर्यारोहक म्हणून तुम्ही देशाविदेशात फिरू शकता. पण हा आनंद मिळवण्यासाठी काही गोष्टींकडे लक्ष द्यायला हवं.

* गिर्यारोहणाची आवड असेल तर याचं रितसर प्रशिक्षण घेऊ शकता. विविध पर्वतरांगा, तिथलं वातावरण, चढाईचा नेमका काळ, पद्धत याची शास्त्रशुद्ध माहिती तुमची चढाई अधिक सुलभ करू शकते.
* चढाई मोठी असो किंवा छोटी... पूर्वतयारी करूनच पुढे जायला हवं. यावेळी शारीरिक फिटनेस खूप महत्त्वाचा आहे. यासोबत तुमची मानसिक तयारीही व्हायला हवी. गिर्यारोहणाआधी शारीरिक कसरत करा.
* डोंगरदऱ्या पालथ्या घालण्यासाठी साधी पादत्राणं उपयोगी पडत नाहीत. यासाठी मजबूत आणि दमदार बूट घ्यायला हवे. हे बूट महागडे असले तरी ते आवश्यक आहेत हे लक्षात घ्या. उन्हाळ्यातल्या गिर्यारोहणासाठी स्टिफ बूट तर हिवाळ्यासाठी क्रँपन रेटेड बूट घ्या.
* हवामानाचा अंदाज घ्या. चढाईला सुरूवात करण्याच्या काही दिवस आधी जवळच्या गावात रहा. तिथल्या लोकांकडून परिस्थितीचा, बदलत्या वातावरणाचा अंदाज घ्या. सुरक्षेचे नियम पाळा. निसरड्या वाटांची माहिती घ्या.
* या प्रवासात तुमच्याकडे भरपूर खाद्यपदार्थ असायला हवेत. या हेतूने शारीरिक बळ आणि ऊर्जा देणारे पदार्थ सोबत ठेवा. पाठीवरच्या सॅकमध्ये मावतील असे पदार्थ घ्या. वेफर्स, बिस्किट टाळा.
* तुमच्याकडे आपत्कालीन तंबू असायला हवा. गिर्यारोहण करताना वातावरण कधीही बदलू शकतं. त्यामुळे मध्येच थांबावं लागलं तर राहण्याची सोय असायला हवी.
* आवश्यक ती औषधं, क्रीम्स जवळ बाळगा. प्रथमोपचारांची पेटी तुमच्याकडे असायला हवी. डोकेदुखी, अंगदुखी, ताप यावरची औषधं जवळ ठेवा.







बालिकाश्रम रस्ता, बोल्हेगावात महानगरपालिकेच्या मोकळ्या जागेत करण्यात आलेली अतिक्रमणे हटवली.

# बालिकाश्रम रस्ता, बोल्हेगावात महानगरपालिकेच्या मोकळ्या जागेत करण्यात आलेली अतिक्रमणे हटवली

### लवकरच संपूर्ण बालिकाश्रम रस्ता मोहीम राबवून अतिक्रमणमुक्त करणार; कारवाईसाठी महानगरपालिकेचे पथक सज्ज; आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे

नगर – बालिकाश्रम रस्त्यावरील व बोल्हेगाव येथील महानगरपालिकेच्या मालकीच्या मोकळ्या जागेत करण्यात आलेली अतिक्रमणे कारवाई करून हटवण्यात आली. महानगरपालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन विभाग व प्रभाग समिती कार्यालयाने ही कारवाई केली. यात जागेतील पत्र्याचे शेड काढण्यात आले. महापालिकेच्या मोकळ्या जागांवर असलेल्या अतिक्रमणांवर कारवाईसाठी प्रशासन सज्ज असून, येत्या काळात महानगरपालिकेच्या मोकळ्या जागेत करण्यात आलेल्या अतिक्रमणांवर कारवाई सुरू केली जाणार आहे. तसेच, बालिकाश्रम रस्त्यावर दोन्ही बाजूंनी करण्यात आलेल्या अतिक्रमणांवरही लवकरच कारवाई सुरू होणार असल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली.

बालिकाश्रम रस्त्यावर महानगरपालिकेच्या मालकीचा मोकळा भूखंड आहे. त्यावर काहींनी पत्र्याचे शेड उभारून दहा ते बारा टपऱ्या टाकल्या होत्या. या सर्व टपऱ्या, शेड गेल्या तीन दिवसांपासून कारवाई करून हटवण्यात आले. सुमारे अडीच एकर क्षेत्र मोकळे करण्यात आले आहे. त्याभोवती पत्र्याची संरक्षक भिंत करण्यात येणार आहे. तसेच, बोल्हेगाव येथेही महानगरपालिकेच्या एका मोकळ्या भूखंडावर पत्र्याचे शेड उभारून अतिक्रमण करण्यात आले होते. याबाबत वेळोवेळी तक्रारी झाल्या होत्या. हे अतिक्रमणही महानगरपालिकेच्या पथकाने कारवाई करून हटवले आहे.

सध्या पत्रकार चौक ते दिल्लीगेट वेस रस्त्याचे काम सुरू आहे. त्यामुळे बालिकाश्रम रस्त्यावर रहदारी वाढली आहे. या रस्त्यावर दोन्ही बाजूंनी मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे करण्यात आली आहेत. पत्र्याचे शेड, दुकानांचे जाहिरात फलक, फुटपाथवर साहित्य ठेवण्यात येते. या भागाची संपूर्ण पाहणी करण्यात आली आहे. तेथील अतिक्रमणे हटवण्यासाठी मोहीम हाती घेण्यात येत आहे. लवकरच सर्व अतिक्रमणे हटवून बालिकाश्रम रस्त्याचा श्वास मोकळा केला जाईल, असेही आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.

# नगरमधून दोन अल्पवयीन मुलींना फुस लावून पळवून नेले

### अज्ञात व्यक्तींच्या विरोधात तोफखाना, कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल

नगर – नगर शहरासह जिल्ह्यात अल्पवयीन मुलींना फुस लावून पळवून नेण्याच्या घटना वाढतच असून अशाच आणखी दोन घटना नगर शहरात घडल्या आहेत. तारकपूर बसस्थानकातून एका १५ वर्षीय तर केडगाव च्या नेप्ती रोड परिसरातून१६ वर्षीय अल्पवयीन मुलीला अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेल्याच्या घटना घडल्या आहेत. याप्रकरणी २ अज्ञात व्यक्तीविरोधात अपहरणाचे २ गुन्हे तोफखाना, कोतवाली पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आले आहेत.

पहिल्या घटनेत केडगाव उपनगरात नेप्ती रोड वर एका मळ्यात आई वडिलांसोबत राहणाऱ्या एका १६ वर्षीय मुलीला अज्ञात व्यक्तीने फूस लावून १७ जानेवारीला रात्री ९ ते १८ जानेवारीच्या सकाळी ६ या कालावधीत पळवून नेले. मुलीची आई सकाळी झोपेतून उठल्यावर तिला मुलगी घरात दिसून न आल्याने तिने तिचा आजूबाजूला शोध घेतला. पण ती मिळून आली नाही. त्यानंतर दोन दिवस तिचा शोध घेवूनही ती सापडली नाही. त्यामुळे आपल्या मुलीला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी आपल्या कायदेशीर रखवालीतुन पळवून नेले असल्याची फिर्याद सदर महिलेने २० जानेवारीला कोतवाली पोलीस ठाण्यात दिली आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात व्यक्ती विरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १३७ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

दुसऱ्या घटनेत भिवंडी येथे राहणारी आणि नगर शहरात एका होस्टेल मध्ये राहून इयत्ता ९ मध्ये शिक्षण घेणाऱ्या १५ वर्षीय मुलीला तिची आई घरी नेण्यासाठी १९ जानेवारीला नगर मध्ये आली होती. तिने मुलीला होस्टेल मधून घेत सायंकाळी ६ च्या सुमारास दोघी तारकपूर बसस्थानकात गेल्या. तेथे एस ती बस आल्यावर बस मध्ये बसण्यासाठी मोठी गर्दी झाली होती. या गर्दीचा फायदा घेत अज्ञात व्यक्तीने सदर मुलीला फूस लावून पळवून नेले. आपली मुलगी बेपत्ता झाल्याचे लक्षात आल्यावर तिच्या आईने तिचा सर्वत्र शोध घेतला मात्र ती मिळून आली नाही.

त्यामुळे आपल्या मुलीला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी आपल्या कायदेशीर रखवालीतुन पळवून नेले असल्याची फिर्याद सदर मुलीच्या आईने २० जानेवारीला तोफखाना पोलिस ठाण्यात दिली आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात व्यक्ती विरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १३७ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# गोवंशीय जनावरांचा टेम्पो पकडला

### ५ गोवंशीय जनावरांची केली सुटका, नगर – कल्याण महामार्गावरील कारवाई





नगर – राज्यात गोवंशीय जनावरांच्या कत्तलीस बंदी असतानाही गोवंशीय जनावरे कत्तल करण्याच्या उद्देशाने घेवून चाललेला अशोक लेलंड कंपनीचा बडा दोस्त टेम्पो नगर तालुका पोलिसांनी गोरक्षकांच्या मदतीने पकडून ५ जर्शी गायींची सुटका केली. नगर कल्याण महामार्गावर नेप्ती गावच्या शिवारात २० जानेवारीला सकाळी ही कारवाई करण्यात आली. यावेळी टेम्पो चालकाला ताब्यात घेऊन २ लाख २५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या बाबतची माहिती अशी की नगर कल्याण रोडने नेप्ती गावच्या शिवारात अशोक लेलंड कंपनीचा बडा दोस्त टेम्पो (क्र. एम एच २३ ए यु ६०११) मध्ये कत्तल करण्याच्या उद्देशाने ५ गोवंशीय जनावरे दाटीवाटीने बांधून त्यांना चारा पाण्याची व्यवस्था न करता वाहतूक करणारा टेम्पो मिळून आल्याने गोरक्षकांनी तो अडवून त्याबाबत नगर तालुका पोलिसांना माहिती दिली. ही माहिती मिळताच सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रल्हाद गिते यांनी सहाय्यक फौजदार डावखर आणि पो. हे.कॉ खंडेराव शिंदे यांना तात्काळ घटनास्थळी पाठविले. पोलिसांनी तेथे जावून टेम्पो चालक शाहीद माजीद शेख (रा. चांदा, ता.नेवासा) यास ताब्यात घेतले. त्याच्या ताब्यातून ५ जर्शी गायींची सुटका करत टेम्पो जप्त केला.

याप्रकरणी पो.हे.कॉ खंडेराव शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नगर तालुका पोलिसांनी टेम्पो चालक शाहीद माजीद शेख विरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ चे कलम ९, ५ (अ) (ब) सह प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करणे बाबत अधिनियम १९६० चे कलम ११ (१), (ड) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पो.हे.कॉ.दाते हे करत आहेत.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते महाराष्ट्र शासनाचा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप उद्योजक पुरस्कार नगरच्या कार्मी सिस्टिम्सला प्रदान करण्यात आला.

# महाराष्ट्र शासनाचा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप उद्योजक पुरस्कार नगरच्या कार्मी सिस्टिम्सला प्रदान

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मान



दीप्ती जाधव-शिंदे

नगर – बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स (BKC) येथे राष्ट्रीय स्टार्टअप दिनानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग व महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीच्यावतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप उद्योजक पुरस्कार २०२५ हा सन्मान कार्मी सिस्टिम्सने पटकावला आहे. हा सन्मान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नगरच्या कार्मी सिस्टिम्सच्या संचालिका दीप्ती जाधव-शिंदे यांना प्रदान करण्यात आला.

कार्मी सिस्टिम्सच्या या यशामुळे महिला उद्योजकतेच्या क्षेत्रात नवा आदर्श निर्माण झाला आहे. कार्मी सिस्टिम्स ही अहिल्यानगर येथील पहिली अशी स्टार्टअप सॉफ्टवेअर डेव्हलपमेंटमधील कंपनी आहे जी हॉस्पिटल आणि क्लिनिकसाठी क्लाऊड सॉफ्टवेअर सोल्युशन बनवते.

# लोकप्रतिधीने मुस्लिम समाजाच्या दर्गाबद्दल केलेल्या वक्तव्याचा निषेध

### बालिकाश्रम रोड येथील त्या मजारला पोलीस संरक्षण द्यावे : लालबाग कब्रस्तान ट्रस्ट व समाजाची मागणी



बालिकाश्रम रोड येथील त्या मजारला पोलीस संरक्षण द्यावे, या मागणीचे निवेदन महापालिका अधिकाऱ्यांना देताना लालबाग कब्रस्तान ट्रस्टचे पदाधिकारी.

नगर – शहरातील लोकप्रतिनिधीने मुस्लिम समाजाच्या दर्गाबद्दल केलेल्या वक्तव्याचा निषेध नोंदवून, ऐतिहासिक वक्फ लालबाग कब्रस्तानमधील सय्यद सहाब यांच्या मजारला त्वरित पोलीस संरक्षण देण्याची मागणी कब्रस्तान ट्रस्ट व समाजाच्यावतीने करण्यात आली आहे. या मागणीसाठी शिष्टमंडळाने निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्रकुमार पाटील, मनपाचे उपायुक्त विजयकुमार मुंडे यांची भेट घेऊन तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात निवेदन दिले. तर राजकीय स्वार्थासाठी शहरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण केला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

याप्रसंगी शेख अयुब सालर, इसाक हनीफ, मुश्ताक अहमद, खलील इब्राहिम, मंजूर अहमद, आबीद हुसेन, अल्ताफ शेख, कासीम इब्राहिम, शकील बिल्डर, साजिद जमीर, आसिफ रजा, नदीम युसूफ, अब्दुल कादिर, जुबेर शेख, मुश्ताक वस्ताद, मतीन खान, सर्फराज शेख, शाह फैसल, फारूक शेख, तन्वीर बागबान, मुजम्मील, समीर भाई आदी उपस्थित होते.

सुमारे दीडशे वर्षांपूर्वीच्या नगर शहरातील बालिकाश्रम भागात ऐतिहासिक वक्फ लालबाग कब्रस्तान असून १९९५ कायद्यान्वये वक्फ नोंदणीकृत संस्था आहे. १९५३ सालापासून धर्मदाय आयुक्त यांच्याकडे या कब्रस्तानची नोंद आहे. येथे सय्यद साहब यांची दर्गा असून, दर्गाचे अतिक्रमण नसून कब्रस्तान मधील ही दर्गा आहे. सर्व धर्मीयांचे श्रद्धास्थान असलेले हे धार्मिक स्थळ आहे. कारण नसताना जाणून-बुजून राजकीय स्वार्थासाठी शहरातील वातावरण दूषित करण्याचा काही मंडळी प्रयत्न करीत आहे. शहरातील नागरिकांची प्रशासनाची दिशाभूल करून स्वतःची राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

सय्यद साहब यांच्या दर्गाला ताबडतोब पोलीस बंदोबस्त देवून संरक्षण द्यावे. दर्गावरुन राजकारण केले जात असताना शहरातील मुस्लिम समाजाच्या कुठल्याही प्रकारे धार्मिक भावनेला आघात होऊ नये, अशी मागणी कब्रस्तान ट्रस्ट व मुस्लिम समाजाच्यावतीने करण्यात आली आहे.

सय्यद साहब यांच्या दर्गावर शहराच्या लोकप्रतिनिधीने आक्षेप घेऊन अतिक्रमण असल्याचे बोलत होते. सदर दर्गा कब्रस्तानच्या जागेत असून, सदर कब्रस्तान नोंदणीकृत रजिस्टर आहे. कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न स्वार्थासाठी निर्माण करून मुस्लिम समाजाला टार्गेट करण्याचे काम केले जात आहे. या संदर्भात काही अनुचित प्रकार घडल्यास मुस्लिम समाज रस्त्यावर उतरेल, असा इशारा आबिद हुसेन यांनी दिला आहे.



सिद्धिबाग शॉपिंग कॉम्प्लेक्सचे गाळे भाडे मार्केट विभागाच्या वतीने गाळेधारकांकडून ११ लाख ५० हजार रुपयाचा धनादेश उपायुक्त वैशाली शिंदे यांच्याकडे सुपूर्त करण्यात आला.

# शास्ती माफीचा लाभ घ्या अन्यथा कर न भरणाऱ्यांवर कारवाई होईल

### सिद्धीबाग शॉपिंग कॉम्प्लेक्सचे ११ लाख ५० हजार गाळेभाडे केले वसूल

नगर – महानगरपालिकेच्यावतीने कर वसुलीसाठी मोहीम हाती घेतली असून आयुक्त यशवंत डांगे यांनी ३१ जानेवारीपर्यंत १००% शास्ती माफी जाहीर केली आहे. त्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या मार्केट विभागाच्या वतीने सिद्धिबाग शॉपिंग कॉम्प्लेक्स मधील १ ते २६ गाळेधारकांना भाडे भरण्याचे सांगितले, त्यानुसार सर्व गाळेधारकांना ११ लाख ५० हजाराचा कर भरत उर्वरित भाडे ३१ मार्चपर्यंत भरण्याचे आदेश दिले. नगरकरांनी शास्ती माफीचा लाभ घेऊन आपला कर भरावा व महापालिकेला सहकार्य करावे अन्यथा कर न भरणाऱ्यांवर कारवाई केली जाईल असा इशारा उपायुक्त वैशाली शिंदे यांनी दिला

सिद्धिबाग शॉपिंग कॉम्प्लेक्सचे गाळे भाडे मार्केट विभागाच्या वतीने गाळेधारकांकडून ११ लाख ५० हजार रुपयाचा धनादेश उपायुक्त वैशाली शिंदे यांच्याकडे सुपूर्त केला.

यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख राजेंद्र दळवी, मार्केट विभागप्रमुख सतीश पुंड, तुळशीराम जगधने, राम चाफे, बापू बेलेकर, आसाराम गुंड, शिवराम गवांदे, गाळेधारक उपस्थित होते.

# इंस्टाग्राम वर बनावट खाते उघडून तरुणीची बदनामी

### नगरच्या सायबर पोलिस ठाण्यात एका विरोधात गुन्हा दाखल

नगर – अनोळखी व्यक्तीने 'इन्स्ट्राग्राम'वर तरुणीच्या नावाने बनावट खाते उघडून तिच्या मित्र-मैत्रिणींना अश्लील फोटो पाठवून तिची व तिच्या कुटुंबाची बदनामी केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी नगरच्या सायबर पोलिस ठाण्यात अनोळखी व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पाथर्डी तालुक्यात एका गावात राहणाऱ्या १७ वर्षीय तरुणीने तक्रार दिली आहे. तक्रारदार तरुणी महाविद्यालयात शिक्षण घेते. तिचे इन्स्ट्राग्रामवर खाते असून त्या खात्यावरून आरोपीने तिचे फोटो घेतले. त्यानंतर तिच्या नावाने बनावट खाते उघडले. त्यानंतर तिच्या मित्र-मैत्रिणी व ओळखीतल्या लोकांना या खात्यावरून अश्लील फोटो पाठविले. त्या फोटोवर अश्लील भाषेत कमेंटही केल्या. त्यामुळे तरुणीला वेगवेगळ्या क्रमांकांवरून फोन येत होते. तिला त्याचा खूपच मनस्ताप झाला. या बनावट इन्स्टाग्राम अकाउंटबाबतची माहिती तरुणीला मिळाली. त्यानंतर या प्रकरणी तरुणीने २० जानेवारीला नगरच्या सायबर पोलिसांकडे तक्रार दिली.

या तक्रारी वरून पोलिसांनी अनोळखी व्यक्ती विरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३५६ (२) सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० चे कलम ६६ (सी) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

### जॉगिंग ट्रॅक समोर लावलेल्या मोपेडची चोरी

नगर – सावेडी परिसरातील जॉगिंग ट्रॅक समोर रस्त्याच्या कडेला हॅण्डेल लॉक करून लावलेली होंडा कंपनीची एक्टिवा मोपेड (क्र.एम एच १६ सी एस ५९४४) कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १९ जानेवारीला सकाळी ८ ते ९ या कालावधीत घडली.

याप्रकरणीराजेंद्ररामशरण गुलाटी (वय ७०, रा. सोनी मंगल कार्यालय समोर, सावेडी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# रस्त्यात अडवून भिंगारमध्ये एका जणास बेदम मारहाण

### मोटारसायकलची केली तोडफोड, तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – अक्षय हंपेसोबत का राहतोस असे म्हणून तिघांनी एकास रस्त्यात अडवून शिवीगाळ, दमदाटी, मारहाण करीत धारदार शस्त्राने वार करून गंभीर दुखापत केली. त्याच्या मोटारसायकलची तोडफोड करून नुकसान केले. ही घटना १९ जानेवारीला सायंकाळी ५ च्या सुमारास भिंगार येथील महेशनगर, शौर्य हॉटेल जवळ घडली.

या बाबतची माहिती अशी की मयूर जालिंदर कानडे (वय २३, रा. मेहकरी, ता.नगर) हा त्याच्या मोटारसायकलने जात असताना त्याला किरण पाखरे, रोहित गवळी, प्रताप भिंगारदिवे (सर्व रा. भिंगार) यांनी अडवून तू अक्षय हंपेसोबत का राहतोस असे म्हणून शिवीगाळ दमदाटी करून लाथाबुक्क्यानी मारहाण केली. लोखंडी कोयत्याने व धारदार शस्त्राने मारून गंभीर दुखापत केली. तसेच त्याच्या मोटारसायकलची तोडफोड करून नुकसान केले. या मारहाणीत मयूर कानडे हा गंभीर जखमी झाला.

या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलिसांनी मयूर कानडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन किरण पाखरे, रोहित गवळी, प्रताप भिंगारदिवे यांच्याविरुद्ध गंभीर दुखापती सह भारतीय शस्त्र अधिनियम ४/२५ नुसार गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास पोलीस हवालदार राठोड हे करीत आहे.

### हॉटेल समोरून मोटारसायकलची चोरी

नगर – हॉटेलच्या समोर रस्त्याच्या कडेला हँडेल लॉक करून लावलेली होंडा कंपनीची युनिकॉर्न मोटारसायकल (क्र.एम एच १७ सी एल ६४६०) कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १८ जानेवारीला रात्री ८.३० ते ११.४५ दरम्यान नगर तालुक्यातील खडकी शिवारातील जय मल्हार हॉटेल समोर घडली.

याबाबत रामेश्वर नारायण शिंदे (वय ३८, रा. पानसवाडी, नेवासा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नगर तालुका पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

